म. ग्रं. सं. ठाणे.
विषय काव्य
सं. क्र. २७९४

# चार नंतु

डॉ. द. रा. बेंद्रे



REFBK-0022851
REFBK-0022851

चार तंतू

चार तंतू

चार तंतू

चार तंतू

ज्ञानपीठ पुरस्कृत कन्नड काव्यसंग्रह

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
काव्य
क्र. 22८49
2598
ग्रंथ ... (स्थळ प्रत)

# चार तंतु

डॉ. द. रा. बेन्द्रे
तथा
अंबिकातनयदत्त

अनुवादक :
त्यं. ल. जोशी

REFBK-0022851
REFBK-0022851

चार तंतु

नवसाहित्य
प्रकाशन

प्रकाशन क्रमांक चोवीस

प्रथम आवृत्ती एक आक्टोबर एकोणीसशे एकोणऐन्शी

© द, रा, बेन्द्रे

प्रकाशिका सौ. आशा वि. जवळकर
नवसाहित्य प्रकाशन
२१ चर्चस्ट्रीट कॅम्प, बेळगाव

मुखपृष्ठ व आतलि चित्रे सुभाष अवचट, पुणे

मुद्रक नारायण प्रिंटींग प्रेस
चंद्रकांत नारायणराव पवार
फुलबाग गल्ली, बेळगाव

मूल्य सोळा रुपये

ज्यांच्या ‘ आन्तरःको ऽ पि हेतुः’ या प्रेमळ प्रेरणेने
मला ‘ नाकु तंती’मधील कवितांचा मराठीत
अनुवाद करावासा वाटला, अशा योगिराज
‘ अंबिकातनयदत्त ’ यांच्या चरणी
त्यांचीच काव्य-सुमने माझीच
समजून सादर समर्पण.

## अनुक्रम

प्रस्तावना ... ९
आत्मनिवेदन ... ११
चार तंतूचे स्वरूप-दर्शन ... १४

## काव्यानुक्रम

आणिक श्रावण ... २५
पुन्हा श्रावण आला ... २७
प्रसूती ... २९
चार तंतू ... ३०
अणु-महत् .., ३३
आपली आठवण ... ३६
देवुडु ... ३७
श्री विवेकानंद-शिखर-प्रगाथा ... ३८
वाटचाला आलेले ... ४२
अहम् इदम् ... ४३
उक्ती - कृती ... ४४
नाद मयुर ... ४५
जे न देखे रवी ... ४६
सादृश्य ... ४७
ऊहा ... ४८
मैदान .,.४९
नटराजास ... ५०
बिच्चारे दृश्य ... ५१

योग ...५२
इंद्रपद ...५३
बॅंबेल ...५४
घाण ...५५
प्रबुध्द ...५६
डु - ड ...५७
नो ऽऽ ना ऽऽ ...५८
नाम ...५९
पराशर ...६१
बंध ...६४
ओव्हर - दूध
(उत्तसभा) ...६५
हेटर - डॉक्सी ...६६
संस्कार तसा आकार ...६७
महात्म - वचन ...६९
कोण कुणाचा सखा, जीवा ? ...७१
निर्बुद्ध ...७३
हा पाडवा ...७४
चैतन्याची पुजा ...७६
पंचारती ...७७
हृदय शेतकऱ्याचे गाणे ...७९
अहंकारविमुक्तार्थाय ,..८०
संभू - शंभू ...८१
दृष्टि - विकास ...८२
हेमव्वाची मिरवणूक ...८३
'ऐकून बोल', 'वचन ऐक' ...८८
अंगाई - गीत ...८९

कवि – परिचय
अनुवादक – परिचय

## प्रस्तावना

शेतांचा नकाशा काढताना त्याची चौकबंदी देतात–उत्तरेला काय, दक्षिणेला काय, पूर्वेला काय व पश्चिमेला काय. पूर्वोत्तर सूर्य, चंद्र, नक्षत्रे जात येत फिरत असतात. उत्तर आणि दक्षिणेचा कणा पृथ्वीच्या कण्याशी तेवीस अंशांचा कोन साधतो हे विदित आहे. सर्व काही या स्थिर, चर गतीच्या घुसळण्याने घडत आले आहे. भौतिक, आत्मिक, दैविक, याज्ञिक हे सर्व ताप, तप झाल्याशिवाय दुसरी गत नाही. जीवनातील भाग्य ते कसलेही असो ते निमुटपणे स्वीकारणे म्हणजे ही दैवाची भागा–भागी अपूर्व संकेताची आहे. भारतीयांना देवासुर संग्राम, दाशराज्ञ युध्द, राम–रावण युद्ध, कौरव-पांडव युद्ध, एकवीसदा निक्षत्रीय करण्याची धुमाळी, सारे आजच्या प्रारब्धाच्या पाठीशी आहे. मनुवंशाच्या नशिबी कृतकृत्यता, धन्यता येणार आहे का ? ऋतुचक्राचा सूर सांगतो—अहंकार निर्बीज होऊ शकेल. परंतु भगवंताचे बीज निष्फल होणार नाही. अशा काही विश्वासानें हे साहित्य निर्माण झालें आहे.

'चार तंतू'च्या पूर्वी माझे पंधरा–वीस काव्यसंग्रह प्रकाशित झाले. त्यानंतरही आता चार–पाच काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत, पुढेही पाच–दहा काव्यसंग्रह प्रकाशित होतील. " व्यासोच्छिष्टं जगत् सर्वं " म्हणविणाऱ्या महाभारतापुढे हा काव्यविस्तार तसा मोठा नव्हे. बुद्ध अवतारानंतरही युद्धांचा अवतार थांबला नाही. जय हे मानवी जीवनाचे सुफल असेल काय? होईल काय? हे अन्वेषण या काव्यात आहे. श्री. अरविंद व जे. कृष्णमूर्ती यांची ग्रंथसंपत्ती आपल्यापुढे आहेच. पण त्याचा सारांश दशावतारी घटनेत होऊ शकेल असे एक गणित विज्ञान ' सूत्रे मणिगणा इव ' असे ओवलेले भाविकांना अनुभवास येईल, अशी अपेक्षा आहे.

शरणागतीच्या नावाने जे आपण हात जोडतो त्या पाचापाचांच्या जुळणीमिळणीत ' अविभक्तं विभक्तेषु ' असा एक सात्विक पदार्थ असतो. तो दिसायला 'तीहीहून निराळे चौथे' ' तुरीयं किमपि तत् ' हे स्थान गाठले पाहिजे. या भूमिकेपासून च्युती होता कामा नये. हे अत्रेय दत्ताचे दान आहे, अंबिकातनयाचे ध्यानही ते आहे. या दानात व ध्यानात 'चार तंतू'ची येजा चालू असते. याचे चिंतन श्री. व्यं. ल. जोशी यांनी केले. याला कवी कृ. ब. निकुम्ब, श्री. दा. गो. देशपांडे, प्राध्यापक श्रीराम पुजारी यांची संमती मिळाली. सुविद्य ग्रंथप्रकाशक श्री. जवळकरबंधू यांनी हार्दीक औदार्याने प्रकाशन कार्य स्वीकारले. ही घटना अगदीच सहजासहजी जमून आलेली नव्हे. ' नाकु तंती ' १९६४ मध्ये प्रकाशित झाले. ज्ञानपीठाचा पुरस्कार १९७४ मध्ये मिळाला. तेव्हापासून दोन आवृत्या निघाल्या. हिंदीत याचे भाषांतर झाले. इंग्रजीत निवडक कवितांचा अनुवाद झाला. कर्नाटकास भिडून असलेल्या महाराष्ट्रात याचा प्रवाह जाण्यास बेळगावचे हे तरुण मित्रद्वय ( श्री. जोशी व श्री. जवळकर ) सहायक होत आहेत. तेव्हा जयपूर्वक स्वागत या कृतीचे होईल अशी मी आशा बाळगतो.

श्री. जोशी यांनी शब्दशः भाषांतर केले नाही हे उघडच आहे. परंतु त्यांच्या सहृदयतेला जी भावप्राप्ती झाली त्याचे उद्गार छंदोबद्धच झाले हे सुचिन्हच आहे. ' चार तंतू ' हा एक प्रतिभेचा नवांकुर आहे असेच मी समजून त्याची वाटचाल सुखाची होईल अशी अपेक्षा करतो.

१३, ' श्रीमाता ', **द. रा. बेंद्रे.**
साधनकेरी, धारवाड—'५८०००८

## आत्मनिवेदन

जीवनातील प्रत्येक घटनेला कार्यकारणभाव असतोच असे काही नाही. काही घटना कारणावाचून घडतात. हाच योग होय. किंबहुना यालाच योगायोग असे म्हणण्यास हरकत नाही पण आयुष्यात या योगायोगाला फार महत्त्व आहे. ध्यानीमनी नसताना अकल्पित घटना घडून येतात. थोर नि चारित्र्यसंपन्न सरस्वतीपुत्राची ओळख होणे हाही त्यातलाच एक प्रकार आहे असे मला वाटते. तसे पाहिले तर साहित्य– नगाधिराजाचे गौरीशंकर गाठणारे महाकवी बेंद्रे कुठे आणि साहित्यात थोडासा रस घेणारी माझ्यासारखी नगण्य व्यक्ती कुठे ? म्हणतात ना कहाँ राजा भोज और कहाँ गंगू तेली? त्यातलाच हा प्रकार. पण पूर्वपुण्याई म्हणा अगर 'दत्तकृपा' म्हणा 'नाकु तंती' ( चार तंतू ) या त्यांच्या प्रसिद्ध काव्यसंग्रहाच्या निमित्ताने- ज्यामुळे त्यांना इ. स. १९७४ साली ज्ञानपीठ पारितोषिक मिळाले —मला त्यांचा परिचय झाला.

तसे पाहिले तर त्यांची प्रसिध्द कविता ' हक्कि हारुतिदे, नोडिदिरा ' — पाहिलंत, पक्षी उडतोय— मी लहानपणी म्हणजे सुमारे पन्नास वर्षापूर्वी माझ्या जन्मग्रामी ऐकली होती. माझा गाव म्हणजे तेरदाळचा परिसर सारा कन्नड असला तरी मराठी वातावरणात वाढलेल्या मला त्यावेळी ती कविता नीट समजली नाही. पुढे ती गोष्ट मी विसरूनही गेलो; पण काळाचा सूड म्हणतात तो असा की, चार एक वर्षापूर्वी मुंबईला गेलो असता माझ्या थोरल्या मुलाने या पुस्तकाची – नाकु तंती – एक प्रत मला भेट म्हणून दिली. तेव्हा या छोटयाशा पुस्तकात आहे तरी काय हे पाहण्याच्या दृष्टीने मी ते

पुस्तक वाचायला सुरवात केली आणि मग मला वाटले की या पुस्तकाचा मी मराठीत अनुवाद का करू नये ? इथूनच आणि यामुळे महाकवींना अगदी जवळून पाहण्याचा, ऐकण्याचा सुयोग मला लाभला.

'चार तंतू' चे स्वरूप–दर्शन या पुस्तकात अन्यत्र घडविले असल्यामुळे त्यासंबंधी पुनश्च लिहिणे अप्रासंगिक होईल म्हणून लिहीत नाही. कोणत्याही महान कलाकृतीचा अनुवाद करणे हे अतिशय कठीण काम आहे, हे मी सांगावयास पाहिजे असे नाही. कारण प्रत्येक भाषा त्या त्या संस्कृतीशी निगडित असते. त्यामुळे ज्या भाषेत आपण अनुवाद करतो त्या भाषेचा इतिहास, संस्कृती यांची आपणाला ओळख असावयास हवी. सुदैवाने श्रीमती दुर्गाबाई भागवत यांनी म्हटल्याप्रमाणे दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटक यांची संस्कृती एक असल्यामुळे आणि संस्कृत भाषेचा या दोन्ही भाषांना आधार असल्यामुळे या तिन्ही भाषा जाणणाऱ्यांना अनुवादाचे काम कष्टदायक वाटत नाही.

या काव्यसंग्रहात एकूण चौव्वेचाळीस कविता आहेत. त्या साऱ्यांचा मी माझ्या अल्प बुध्दीने अनुवाद करण्याचा प्रयत्न केला आहे. कारण 'चार तंतू' हे उद्‌भव काव्य आहे. जे उद्‌भव, जे उत्स्फूर्त ते कळण्यास कठीण आणि त्याहूनही त्याचा अनुवाद करणे जास्त कठीण. शिवाय या कविता कविराज बेंद्रे यांच्या. त्यांच्या आजतागायतच्या अपार तपश्चर्येचे हे अपूर्व फळ. ज्याने त्याने आपल्या मगदुराप्रमाणे या फळाची गोडी चाखण्याचा प्रयत्न करणेच उचित असे मला वाटते. अर्थात् मराठी पेहराव चढविताना कन्नड काव्यश्रीच्या मूळच्या सौंदर्याला धक्का न लागू देण्याचा मी कसोशीने प्रयत्न केला आहे. तो कितपत यशस्वी झाला आहे हे ठरविण्याचे काम सुजाण वाचकांचे आहे.

महाकवींचे 'चार तंतू' हे काव्य म्हणजे जणु जगन्नाथाचा रथ. याला माझ्या अनेक सुहृदांनी व हितचिंतकांनी हातभार लावल्यामुळे हे अनुवादाचे काम थोडे सुकर झाले. त्या दृष्टीने बेळगावचे ख्यातनाम कवी श्री. कृ. ब. निकुम्ब, नामवंत कन्नड प्राध्यापक श्री. पी. के. भागोजी, 'बालकवी'कार श्री. कृ. ब. मराठे व श्री. बापू साठे यांनी मला वेळोवेळी ज्या सूचना दिल्या त्याबद्दल

या सर्वांचा मी आभारी आहे. तसेच ‘ चार तंतू ’ च्या स्वरूप–दर्शनासंबंधी डॉ. वामनराव बेंद्रे यांची मला मोलाची मदत झाली आहे. शिवाय पुण्याचे प्रा. दा. गो. देशपांडे यांनी सारे हस्तलिखित आपुलकीने वाचून अनुवादासंबंधीचा आपला अभिप्राय कळविल्याबद्दल त्यांचे आभार मानल्यावाचून राहवत नाही. त्याचप्रमाणे धारवाड येथील कविवर्यांचे निस्सीम चाहते श्री. आर. बी. जाधव यांनी या कामी मला दिलेल्या प्रोत्साहनाबद्दल मी त्यांचाही आभारी आहे. खुद्द कविवर्यांचे काय आभार मानावयाचे नि कसे आभार मानावयाचे ? त्यांची उदात्तता, वाङमयीन महात्मता आणि अभिजात रसिकता या गोष्टी पाहिल्यावर त्यांना उपमाच द्यावयाची झाल्यास ती ‘ गगनं गगनाकारम् ’ ही उपमा द्यावी लागेल. त्यामुळे त्यांचे शाब्दिक आभार मानणे हे नुसते औपचारिक होईल. शिवाय त्यांच्या ऋणातून मुक्त होण्याची माझी इच्छा नाही. शेवटी प्रकाशकासंबंधी दोनच शब्द. कोणत्याही पुस्तकाला चालू जमान्यात योग्य प्रकाशक लाभणे हे उबराचे फूल लाभण्याइतके अवघड झाले आहे. अशा परिस्थितीत येथील ‘ नवसाहित्य ’ या नामवंत संस्थेचे चालक जवळकरबंधुद्वय यानी आपुलकीने मदतीचा हात दिला आणि अल्पावधीतच सुंदर नि आकर्षक सजावटीचे पुस्तक तयार करून दिले याबद्दल मी त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो.

अर्थात् हे जे काही यदृच्छया घडले, ती सारी ‘ दत्तकृपा ’. जिने माझे पुत्रवत् पालन करून सारे अपराध पोटात घातले, जिने आपल्या विशुद्ध नि सात्विक आचरणाने माझ्यावर थोडेफार संस्कार केले आणि जी सध्या हयात नाही अशा माझ्या प्रेमळ आत्याचा प्रभाव. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे मला लाभलेला ‘ अंबिकातनयदत्तां’चा आशीर्वाद. इत्यलम् ।

११६५, ‘ इंद्रप्रस्थ, कोनवाळ गल्ली,
वेणुग्राम (बेळगाव) दि. २८-३-१९७९

**व्यं. ल. जोशी**

## 'चार तंतू'चे स्वरूप–दर्शन

कर्नाटकात काय नि महाराष्ट्रात काय महाकवी बेंद्रे यांचे नाव माहीत नसणारा साहित्य-प्रेमी माणूस विरळा. कारण त्यांनी आतापर्यंत कन्नड भाषेत विपुल आणि मराठीत बरेचसे मौलिक लिखाण केले आहे. शिवाय गेल्या साठ वर्षांत त्यांनी कन्नड साहित्याची विशेषतः काव्याची बाग फुलवून त्याचे नंदनवनात रुपांतर केले आहे. त्यांच्या 'नाकु तंती' ( चार तंतू ) या कन्नड काव्यसंग्रहास ज्ञानपीठ पारितोषिक मिळाल्यामुळे त्यांच्या मूळच्या कीर्तीत भर पडली आहे. या काव्यसंग्रहाचा यापूर्वीच हिंदी भाषेत अनुवाद झालेला आहे. मूळ कन्नड काव्यसंग्रह इ. स. १९६४ मध्ये प्रसिद्ध झालेला असला तरी इ. स. १९७४ मध्ये त्याला ज्ञानपीठ पारितोषिक मिळाल्यानंतरच त्याला खरी प्रसिद्धी मिळून त्याची दुसरी आवृत्ती निघाली. आधीच या काव्याचा विषय अध्यात्माचा म्हणजेच 'सौंदर्यशोध आणि आनंद–(देवत्व) बोधा'चा आणि तोही संख्याशास्त्रावर आधारलेला. शिवाय ब-याच कन्नड साहित्यिकांनीही हा काव्यग्रंथ दुर्बोध म्हणून 'वाखाणलेला' ! अशा परिस्थितीत या काव्यसंग्रहाचे स्वरूप–दर्शन करून देणे हे एक धाष्टर्याचेच काम आहे. तरी या काव्याच्या अलौकिकत्वाने भारावून गेल्यामुळे मी हे धाडस करीत आहे. कारण कुणाला तरी ते केलेच पाहिजे. निदान अनुवाद करणाऱ्याने तरी माघार घेता कामा नये.

महाकवी बेंद्रे हे नुसते कवी नाहीत, तर ते तत्वचिंतक आहेत, दार्शनिक आहेत. 'तद्विष्णोः परमं पदं सदा पश्यन्ति सूरयः' या प्राचीन ऋषीमुनींच्या सूरिपंथातले ते ब्रह्म-जिज्ञासु आहेत. साहजिकच ते अध्यात्मवादी आहेत. पण ते डोळस असे अध्यात्मवादी आहेत म्हणून ज्ञान निर्दिष्ट होण्यासाठी संख्याशास्त्राची जोड असावी लागते असे त्यांचे मत आहे.

या काव्यसंग्रहाचे नावच आहे मुळी ' चार तंतू '. यात एकंदर चौव्वेचाळीस कविता आहेत. कविवर्यांच्या प्रतिभेच्या तानपुऱ्याला असलेले हे चार तंतू म्हणजे नानु (मी), नीनु (तू), आनु (मूल) आणि तानु (आपण) होत. मी (पिता), तू (माता), ते (या दोघांच्या पोटी जन्माला येणारे मूल), आणि आपण (या कुटुंबाचे भले चिंतणारी परमात्मशक्ती) अशी खुद्द कविवर्यांची भावना. माता, पिता नि मूल वगळल्यास या जगात दुसरे काय आहे ? यांच्यामधील झगडयाने मानवी इतिहास घडत असतो आणि रम्यभीषण अशा जीवनसौंदर्याची प्रचीती येत राहते. यांच्यात सुख, शांती व समाधान प्रस्थापित होण्यासाठी देवसंभव होऊन नवयुगाच्या नांदीला सुरवात होते, या सूत्रानुसार ' चार तंतू ' मधील अनेक कवितांची रचना झाली आहे. शिवाय महाकवी बेंद्रे हे एक अव्वल दर्जाचे ' छांदस ' असल्यामुळे वैदिक (सामगान) छंदापासून मुक्तछंदापर्यंत सारे प्रकार त्यांनी या काव्यसंग्रहात यशस्वीपणे हाताळल्याचे दिसून येईल.

अंबिकातनयदत्तांना श्रावण महिन्याचा सोस फार. कारण त्यांच्या जीवननाटकातील अनेक सुखदु:खांच्या घटना या महिन्यात घडल्या आहेत. त्यामुळे साहजिकच त्यांनी श्रावण महिन्यावर अनेकानेक अशा सरस कविता लिहिल्या आहेत. तसेच या काव्यसंग्रहातील पहिल्या दोन कविता श्रावण-मासावर आधारलेल्या असून आपणाला झालेल्या ज्ञानोदयाचे कवींनी त्यांत वर्णन केले आहे. शिवाय त्यांना श्रावण व श्रवणेंद्रियाचे अगदी जवळच नाते असावे असे वाटते. त्यामुळे श्रुतीकडे लक्ष देऊन काव्यकृतीची रचना केली आहे कविवर्यांनी. म्हणून ते सहज म्हणून जातात :

श्रावण आला
' कान उघडे ठेव ' म्हणाला.

या काव्यात कवींच्या 'प्रज्ञे'तून म्हणजे 'प्रतिभा–पुष्पा 'तून अवतरलेले शब्द नि संदर्भ हे काव्याचे विषय नव्हेत. हे शब्द नि संदर्भ कवींना जसे स्फुरले तसे त्यांनी अलगद एकापुढे एक असे ठेवून दिले आहेत. हे असे का याला उत्तर मिळणे कठीण आहे. कारण हे एक उत्स्फूर्त काव्य आहे. सामान्य बुद्धीचे कवच फोडून भावविवशतेच्या भरात बाहेर पडलेल्या शब्दांना नि संदर्भांना कार्यकारणभाव शोधणे कठीण आहे. देहाचा तानपुरा करून कवी गात असताना–

कैलासाखाली पडला अडकून । दशानन
सोडव । जाऊ दे त्याला । आत्माराम–भवनाला
( आणिक श्रावण )

अथवा

भालचंद्रा, एकदन्ता, बीळ, उंदीर, तडफड
तद्धितान्ता, कृदन्ता, वक्रदन्ता
(पुन्हा श्रावण आला)

इत्यादी शद्ब विनासायास जुळून येतात. येथे कैलास, दशानन, भालचन्द्र, एकदन्त हे काव्यविषय नव्हेत. तर अहंकारापासून मुक्त होण्यासाठी आत्मारामाचे चिंतन झाले पाहिजे हा कवितांचा आशय आहे. तसेच ' अहंकार विमुक्तार्थाय '–

दास पुरंदर विठ्ठल–देवा
अहंकार मम आता जावा

अशी विठ्ठलाची आर्त आळवणी केली आहे योगिराजांनी.

' अणोरणीयान् महतो महीयान् ' असा परमात्मा आहे असे सारे भक्तजन मानतात, हे भक्त देहधारी आहेत. त्यांच्या चर्मचक्षूपुढे विशाल असे विश्व पसरले आहे. तेव्हा या त्याच्या चर्मचक्षूंना या विश्वाचे ज्ञान नि स्नेह या तत्त्वांची जाणीव कशी होईल हा प्रश्न ' अणु-महत् ' या कवितेत चर्चिला गेला आहे. या संबंधीच्या चिंतनातून ' सादृश्य, ' ' अहम्–इदम् ', ' मैदान', व ' प्रबुद्ध ' या कविता साकार झालेल्या आहेत.

या काव्यसंग्रहातील ' उक्ती–कृती ' ' ते प्रबुद्ध ' ही तेरा सुनीते महत्त्वाची आहेत. कारण या सुनीतांतूनच कवींच्या ' परा चिंतना'ला खरा बहर आला आहे. या साऱ्यांची रचना छंदोबद्ध असून त्यांची काव्यसूत्रे खालीलप्रमाणे आहेत :

१) स्पर्शाने जागे होऊन दर्शनाच्या प्रकाशात
दिसला नाद मार्ग, मरणांचे माहेरघर, निधी.
शब्द श्रुती झाल्यावर कृती होईल वाचा, ( उक्ती–कृती )

२) वर पिवळा लेप, नसता आत वचनसूत्र
प्रज्ञा प्रतिभा–पुष्प तर संज्ञा कांचनपत्र !
वाच्य वर्णाक्षरांत अद्‌भुत मयूर केका
श्री अनिर्वाच्याला नाही भाष्य, ऐका. ( नाद मयूर )

३) आत्मा म्लान दिसतो, तो त्याचा स्वभाव
ज्ञान मृत भासते तेथे विचारांचा अभाव. (जे न देखे रवी)

४) ही भिंत; तरीही तिकडे पाहा, अशीच एक स्मृती
उमटल्यासारखी विस्मृतीच्या पडक्या जागेतील कृती.
हा ठिपका जिकडे पाहतो तिकडे आकार.
इकडे डोळ्यात बाहुली, तिकडे बाहुलीला डोळा.
कुणीही कोरलेले असो; उलगडलेले असो हे सादृश्य
या अदृष्टाचा दृष्टि-लाभ दृश्याला अवश्य. (सादृश्य)

५) निर्विषय अशा सृष्टीत भोग आत्मक्रीडा (ऊहा)

६) दृश्य आणि अदृश्य यांमध्ये लक्ष्मणरेषा ओढून
चंचल मन आणि त्याच्या शब्दांचे शेपूट धरून.
शेणीने नव्हे तर हृदय–काष्ठांनी तयार होते आग. (मैदान)

७) ...... ...... ...... भेद तेथे अभेद
सीमंतिनीची शिवरेखा, चांगभला ! (नटराजास)

८) मग अपत्यसुलभ वात्सल्याचे काय? शोक मात्र अबोल
का दिसू नये या जगाला ? का सारेच धृतराष्ट्र !
आमच्या पापाप्रमाणे आमचा कोपही अविवेकी
दुष्कृत्यावर दयेचा वर्षाव हवाच हवा. (बिच्चारे दृश्य)

९) मानवाचे भविष्य शिल्पकाराच्या हातातील दगड दीड फूट.
(योग)

१०) भविष्याच्या अतीतात बलीला इंद्रपदाचे दान. (इंद्रपद)

११) भांडणाऱ्या दोघांत कोण होता जागृत ?
रामरावणासाठी वानर होते भांडत (बॅबेल)

१२) मदनाचे अनिर्वाच्य प्रेम झंकारणाऱ्या ताना. (घाण)

१३) अंतःपडदा दृष्टी आणि दूरदृष्टीच्या मधेच. (प्रबुद्ध)

कोणते काव्य श्रेष्ठ नि कोणते कनिष्ठ या संबंधीचा वानरांनी चालविलेला झगडा आता पुरे करावा. कारण कोणत्याही काव्याला आज नाही तरी कधीतरी भविष्याच्या अतीतात 'इंद्रपद' निश्चित लाभेल असा 'कालो ह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी' असा भवभूतीप्रमाणे कविवर्यांनी आशावाद प्रकट केला आहे.

शब्दचिंतनाबरोबर वर्णचिंतनही पाहिजे असे कवींना वाटते. 'डू'

आणि 'नो' हे दोन्ही वर्ण त्यांच्याकडे स्वप्नलहरींप्रमाणे येतात. ते काय म्हणत असतील हे कान देऊन ऐकून या कवितांची रचना केली आहे कवींनी. श्रुती–कृतीच्या संवादात भाषा–सौहार्द असतो. भाषाभेद असत नाही. म्हणून 'डू', 'नो', 'ओव्हर दूध', 'आइसक्रीम', 'मै ना', मै नाचुंगी, 'मीरा के प्रभु', 'नो–पेन,' 'नो–गेन', 'सिंफनी' वगैरे हिंदी व इंग्रजी शब्दांचा त्यांनी मुक्त वापर केला आहे.'

या काव्यसंग्रहात काही श्रद्धांजलीपर कविताही आहेत. त्या म्हणजे 'आपली आठवण', 'देवुडु', 'श्री विवेकानंद–शिखर–प्रगाथा,' या कविता होत. गोविंद पै यांची ज्ञान–जिज्ञासा, देवुडु यांची जीवन हे एक नाटक असल्याची भावना व विवेकानदांची सद्भावनेकडे नेणारी विवेकयुक्त आनंदशक्ती या साऱ्या गोष्टींचे मार्मिक वर्णन या कवितांत आढळून येईल.

आनन्दी मी, आनन्दी मी तो वृषभध्वज बैल म्हणून
आलो मी शिवशक्ती खांद्यावर घेऊन
आजच न विसरून. (श्री विवेकानंद–शिखर–प्रगाथा)

'वाटचाला आलेले' या कवितेत कविवर्यांनी आपल्या 'स्थितिगती'ची भूमिका स्पष्ट अशा शब्दांत मांडली आहे :

घाम गाळून मिळालेला तेवढाच फायदा
बाकीचे जीवन म्हणजे नुसता तगादा.
माझ्या कक्षेतच माझे परिभ्रमण
बाहेरचे नुसते आक्रमण.

'काम ईशार्पित' करून ईश्वराचे नामस्मरण केल्यास तो आमच्यामधील 'म' मत्वाचा, अहंकाराचा 'ना' म्हणजे नाश करतो. नाम म्हणजे भक्त आणि भगवान् यांच्यामधील प्रेमसूत्र. हे विश्व विशाल असल्यामुळे 'नाम प्रेम–भूम' असे कवींनी 'नाम' या कवितेत म्हटले आहे

परा, पश्यन्ति, मध्यमा आणि वैखरी असे वाक्शक्तीचे चार टप्पे आहेत. परा हा सर्वांत श्रेष्ठ टप्पा. तिकडे जायचे असेल तर शररूपाने नेम धरला पाहिजे. हा मार्ग अतिशय कठीण. 'पश्यन्, पश्यन्, श्वसन्, जिघ्रन्' या मार्गाने नितळ होऊन परा वाक्शक्तीमध्ये प्रवेश केल्यास तेथील अंधार नाहीसा होऊन प्रकाश येतो, अशी श्रद्धा व्यक्त केली आहे कविवर्यांनी 'पराशर' या कवितेत. दोनचार ओळी सोडल्यास या कवितेची सारी रचनाच सुलभ संस्कृतमध्ये केली असल्याचे दिसून येईल. भारतीय

तत्त्वज्ञानाचा--वेदोपनिषद ते अरविंद तत्त्वज्ञान-व संस्कृत भाषेचा कवीवर केवढा जबरदस्त प्रभाव पडला आहे याची कल्पना ही कविता वाचल्यास येईल. वानगीदाखल खालील ओळी पाहा :

परा ऽ शररूपा ऽ
शरण्या ऽ – शरणा
शरधनुरूपा वाणी.
अमृतस्त्रव धारा
वैखरी – धीवरी

समाजात लहान-थोर, उच्च-नीच, व ज्ञान-अज्ञान असे झगडे अव्याहत चालू आहेत. Parliament of the man and Federation of the world ही टेनिसनची विश्ववंधुत्त्वाची कल्पना कविकल्पनाच होऊन राहिली आहे. कारण आम्ही बोलतो एक नि करतो दुसरे. स्थिरतेपेक्षा अस्थिरताच वाढली आहे. म्हणून ते म्हणतात :

भारतमातेजवळ उत्तरेच नाहीत
प्रश्नांवाचून दुसरे काहीच नाही
उसाशांच्या ओळीच ओळी
प्रश्नांची फक्त साखळी (कोण कुणाचा सखा, जिवा? )

यामुळे ' शांत सागरी कशास उठविलीस वादळे ' अशा मनस्थितीत क्षुब्ध होऊन ते म्हणतात :

ज्यांचा जसा संस्कार, त्यांचा तसा आकार
उरलेला सारा विकार. (संस्कार तसा आकार)

पण एवढ्यावरच न थांबता–

आमचा देव मोठा, लहान तुमचा देव
दीपदान देणाराच मारेकऱ्याचा महादेव
बुद्धच असू दे नाहीतर असू दे सिद्ध
इतिहासापासून धडा न घेणारा शुद्ध निर्बुद्ध. (निर्बुद्ध)

असा सावधगिरीचा इषाराही जाताजाता त्यांनी समाजाला दिला आहे. कारण ' नानृषिः कुरुते काव्यम् ' या उक्तीप्रमाणे खरा कवी हा नुसताच बोलघेवडा तत्त्वप्रतिपादक नसून तो दृष्टाही असतो, नव्हे असावा लागतो असे कवींना वाटते.

आत्मा, परमात्मा, आणि अंतरात्मा या सर्वांचे ज्ञान करून घ्यावयाचे असल्यास सौजन्य नावाचे फूल, सामर्थ्य नावाचे बेलाचे पान, सत्य नावाचा

दीप, प्रीती नावाचा नैवेद्य, सौंदर्याचे ध्यान आणि आनंदाचे सामगान या गोष्टी हव्या. हीच खरी 'चैतन्याची पूजा.' तेव्हाच देहीच्या हृदय–पुंडरिकात सुप्त असलेल्या विठ्ठलाची जाणीव होते.

मानवाच्या ठिकाणी विशाल मनोभावाचा उदय झाला पाहिजे. दगडालाही डोळे असतात आणि 'पण्डिताः समदर्शिनः' हा साहित्याचा सद्‌भाव त्याच्यात आला पाहिजे वगैरे विचार त्यांनी 'संभू–शंभू.' 'दृष्टि–विकास,' आणि 'हा पाडवा' या कवितांत अत्यंत प्रभावीपणे मांडले आहेत.

'देमव्वाची मिरवणूक' या कवितेत लोकशाहीच्या विकृत स्वरूपाचे यथार्थचित्रण कवींनी केले आहे. देही देव न होता दानव झाल्यास, 'साक्षर' सारे 'राक्षस' झाल्यास पुढे काय हा प्रश्न कवीला भेडसावतो :

गायलेला सारा छंद, केलेला तो प्रबंध
जमलेली ती सभा, अट्टाहास
बुद्ध कल्की येऊन कृतार्थ ते झाले
कृतयुगाला लाभला सन्यास.

त्यामुळे कृतयुगाच्या पुनरागमनासाठी नवमानव आले पाहिजेत, नव्हे ते येतील ही कवींची भावना; कारण ते पूर्ण आशावादी आहेत, हे 'ऐकून बोल–वचन ऐक' या कवितेतील खालील ओळी वाचल्यास दिसून येईल–

विपत्काल गेला, सुरगान रम्य होऊ दे
मानवतेचे सार्वभौमत्व सूर्यचंद्रांना पाहू दे

आता राहता राहिली 'अंगाई गीत' ही शेवटची कविता. दशावताराचा धागडधिंगा आता पुरे. देवतात्म्याच्या हृत्मधुबिंदूचा उदय होऊ दे. पुरुषोत्तमाचा अवतार होवो अशी आशा प्रकट करून –

ॐ स्वस्ति, स्वस्ति, स्वस्ति
भूमण्डल–स्वास्थ्य

अशी प्रार्थना करून महाकवींनी परमात्म्याला 'पंचारती' ओवाळली आहे, आणि देव–जन्माच्या स्वागत–गीताबरोबर समर्पकपणे काव्यसंग्रहाची त्यांनी समाप्ती केली आहे.

या संदर्भात मी विचारलेल्या काही प्रश्नांना कविवर्यांनी मोकळेपणाने उत्तरे दिली आहेत. त्यामुळे एक नवा प्रकाश-झोत या विषयावर पडत असल्यामुळे ती प्रश्नोत्तरेही खाली दिली आहेत. ती अशी :

‘चार तंतू’ची कल्पना आपणाला केव्हा व कशी सुचली?

चारीची कल्पना माझ्या बाळमनावर बिंबली त्याचे कारण चौथे बोट, ज्याला तर्जनी म्हणतात–तिचा उपयोग मार्गदर्शनाला व आदेश देण्याला होतो. शाळेत गेल्यावर दिशा, उपदिशा सांगण्याला चार हा आकडाच उपयोगी पडला. चव्हाटा म्हणजे जेथे चार वाटा एकवटतात अशा कामनकट्टा या धारवाडातील जागीच वाढलो. सोंगट्याचा पटही असाच असतो. चार लोक मिळून चारगटपणाचे अथवा चावटपणाचे बोलतात या प्रयोगाला चारच कारण हे पुढे लक्षात आले. चातुर्वर्ण्य, चतुर्विध पुरुषार्थ, चतुर्वेद असे किती चारीचे गट सांगावे? गट चाराचा झाला की त्याला चारगटच म्हणावे असे चारगट लोकांनीच ठरविले आणि चारीचे चातुर्य, चारुत्व आणि चारित्र्य या नावांना या चारगटांमुळे बट्टा आला. Clever चा अर्थ लुच्चा होतो तो असाच. वेदांत, गीतेत, धर्मशास्त्रात व अरविंदाच्या शिकवणीत याचे स्थळ होतेच. चार तारेचा तंबोरा कुणी पाहिला नाही? हे बीज माझ्या बुद्धीच्या भूमिकेत कधीपासून तरी असलेच पाहिजे.

टीप:– तसेच माणसाच्या अंतिम महायात्रेलाही चारच माणसे लागतात. ही कल्पना दिव्यत्वाचा संदेश देणाऱ्या महाकवींना कशी सुचणार? ती कल्पना माझ्यासारख्या सामान्य माणसाला सहजासहजी सुचते याचे कारण, मला वाटते, तो ‘अमृतस्य पुत्रः’ नाही अगर नसावा.

अध्यात्म–विषयात शब्दापेक्षा संख्येला महत्त्व का?

अध्यात्मात बोलघेवडेपणा पुष्कळ असू शकतो. हरिदासांच्या कथा, आड कथा आणि पुराणिकांचे पाल्हाळिक पुनः पुन्हा बोलणे हे अध्यात्मात जमा होते असे पुष्कळांचे मत दिसते. त्यामुळे अध्यात्मचर्चा वेळ घालविण्याचे साधन होऊन बसले आहे. अशाच वेदांती गप्पात संख्याशास्त्रही ओढले गेले. असे होता कामा नये असे माझ्या मनावर दासबोधात येणाऱ्या आकड्यांनी बिंबवले होते. ‘एकं सांख्यं च योगं च’ या उक्तीने योग समजावून घेण्यास संख्या उपयोगी पडते हेही माझ्या बुद्धीच्या स्तरावर प्रतिष्ठित झाले होते. त्याची प्रतिष्ठा व्हावी म्हणूनच मी संख्येवर एवढा जोर देतो. वादिष्ट,

तर्कट, अर्धवट वेदांती धुडगूस बंद झाला पाहिजे, ही माझ्या बुद्धि-योगाची दिशा आहे.

संख्याशास्त्र व सांख्ययोग यांचा परस्पर संबंध कोणता ?

संख्य म्हणजे रणांगण, कुरुक्षेत्र (संख्ये समुपस्थितम्). अठरा पर्वांचे भारत, अठरा दिवसांचे युद्ध, अठरा अक्षौहिणी सैन्यांचा संहार, अठरा अध्यायांची गीता आणि अठरा वर्षांचा राहुकाल. हे अठराचे कंत्राट पुष्कळ आहे. धर्म–अधर्म–निर्णय रणांगणावर होत असताना संख्या नियती ही काय चीज आहे हे ओळखावे लागते. एकशे एक कौरव गेले का ? पाचच पांडव उरले का ? ही संख्या नव्हे तर काय आहे ? धर्माधर्माच्या युद्धात संख्याज्ञानाने सैन्याचे व्यूह रचावे लागतात. 'सांख्यं ज्ञानम्,' संख्येशिवाय ज्ञान निर्दिष्ट होत नाही, निर्दुष्ट होत नाही.

शब्द अगर संख्याशास्त्रापेक्षा काही संतांनी मौनाला जास्त महत्त्व दिले आहे अध्यात्म–विषयात. आपणाला काय वाटते ?

मौनावरून ज्ञान, अज्ञान ठरविता येत नाही. खरा मौनी श्रुतीकडे लक्ष देतो. श्रुतीसंख्या ही बोटे करून दाखवा अथवा बोलून दाखवा दोन्हींचा अर्थच एकच. संतांचे मौन निराळे व अपंडिताचे मौन निराळे.

आपण सुम्नस्पंदाला (उक्ती–कृती कविता) ब्रह्म म्हणता. स्पंदनाला सुरवात झाल्यावर जीवोत्पत्ती होत नाही काय ?

सुम्न हा संस्कृत शब्द आहे. मराठीतही असेच लिहिले जाते. कानडीत न अर्धे करून म जोडले जाते. सुषुम्ना नाडीत म्न आहे. सुम्मने म्हणजे मौनाने असा कानडीत अर्थ आहे. संतांच्या मौनात एका छंदाचा स्पंद असतो. ते मरतुकडे नसते. First Came the word and then came the world. God Said let there be light and there was light. शब्दब्रह्माला झटकून तथा-कथित शुद्ध ब्रह्म हे म्हणणे भगवद्गीतेला मान्य नाही. यज्ञाचा ब्रह्माशी संबंध येतो तो छांदसिक मंत्रमय शब्दामुळेच. तेथे असते देवतांचे प्रतिष्ठापन–संवत्सरः यज्ञः या भूमिकेवरून मी मंत्रमय शब्दा-विषयी बोलत आहे. तेव्हा स्पंद आणि छंद हे ब्रह्माची अप्रतिष्ठा करीत नाहीत. सगळे बोलणेच जीवोत्तर आहे. तुम्ही जीव प्रश्न करीत आहात. मी जीव उत्तर देत आहे. त्यामुळे ब्रह्माला उपाधी

काय निर्माण होते ? ' ऐसे हे निरुपाधिक.'

आपले काव्य उत्तरोत्तर दुर्बोध होत चालले आहे असे काही लोकांचेच नव्हे तर काही विद्वान (!) साहित्यिकांचेही म्हणणे आहे. व्यक्तिशः मला मात्र तसे वाटत नाही. तरी आपण याचा खुलासा करावा.

हे उत्तम लक्षण आहे की तुम्हाला हे म्हणणे खरे वाटत नाही. ज्या विद्वानांना हे पटत नाही त्यांच्याशी संवाद कसा घडू शकतो ? वाद करण्याची इच्छा तर मला नाही. विद्वान अर्थग्रहणाच्या नावाने अडून बसतात. त्यांना सद्भाव ही दुसरी एक चीज आहे हे पुरेसे कळत नाही. सगळ्याच विद्वानांविषयी मी असे म्हणत नाही. 'वेदवित् कविः' असे 'विष्णुसहस्त्रनाम' सांगत आहे. ज्ञानेश्वरांनी 'भावार्थदीपिका' लिहिली. यथार्थदीपिकावाले आपल्या वाटेने जाऊ देत. भावार्थदीपिका असते तशी ती नसावी या अडेलतट्टूपणाचा अर्थ मला होत नाही. 'नाकुतंती'च्या (चार तंतू) काव्यात वागर्थ–संप्रक्तीहून सद्भाव–साहित्याला जास्त महत्त्व आहे. 'पण्डिताः समदर्शिनः.' बेंद्रे हे कवी आहेत, साहित्यिक आहेत हे सर्वमान्य झालेले आहे. समीक्षेच्या इतिहासात हे उल्लिखित आहे. 'विद्वान' सारे मला अनुकूल असतीलच असे नव्हे.

'चार तंतू' मध्ये आपण अन्य भाषांतील शब्दांच्या (हिंदी, इंग्रजी वगैरे) केलेल्या मुक्त वापराबद्दल जास्त खुलासा करावा. कारण बोलण्याची क्रिया व्यवहारासाठी असते; पण लेखन स्थायी–स्वरूपाचे असते.

'लोके वेदे च' असे सांगितलेलेच आहे. लोकभाषेचा आणि वैदिकाचा विरोध नाही. जे बोलण्यात चालते ते साहित्यात असू शकते. वेदातच अनार्य भाषेचे शब्द आहेत असे कबूल करूनही त्याला अर्थ लावले गेले आहेत. मीमांसकांनी आणि अलीकडे लोकमान्यांनी याची चर्चा केली आहे. वैदिक साहित्याला जे चालते ते बेंद्रेसाहित्यालाही चालते. निरुक्त इत्यादी खटपट तर इथे असतेच. 'निघंटु' याकरिताच रचला जातो. धातू मूळ धरून शब्द व्युत्पत्ती सांगणे इत्यादी व्यापार व्याकरणात आहेच.

परिपूर्ण जीवन म्हणजे काय ? त्यासाठी कोणत्या गोष्टींची आवश्यकता आहे.

हा प्रश्न फार निराळ्या स्वरूपाचा आहे. परंतु या काव्य-संग्रहाला धरून सांगावयाचे झाले तर नानु (मी), नीनु (तू), तानु (आपण) यांच्या समन्वयाची सिद्धी 'आनु' (मूल) करीतच असते. याला तर जीवन म्हणतात. मरणाची वाट पाहात बसणे हे जीवन नव्हे. जन्ममरणांतील आत्मा सदेही काय किंवा विदेही काय ? जीवन्मुक्त इत्यादी भाषा इथे येते हेच तर बेंद्रे यांच्या चोवीस काव्य-संग्रहांतून, नाटकांतून, समीक्षेतून व इतर लेखांतून प्रतिपादले आहे. दिव्य ध्वनीने बोध होत राहणे हेच जीवन. अनुभव, आनंद आणि रस यांच्याविषयी जुळतेमिळते चिंतन समीक्षकाला असावे लागते.

महाकवी बेंद्रे यांची विचारसरणी मूलगामी स्वरूपाची असूनही ती 'दिव्यत्वाला स्पर्श' करून जाणारी आहे. त्यामुळे 'दिव्यत्वाला स्पर्श कराया भय वाटे मजला' अशी सामान्यांची स्थिती झाल्यास त्यात नवल कसले ! पण परिपूर्ण जीवनाच्या परिसीमेचे पदलालित्य पदोपदी प्रकट होणाऱ्या या पद्यसंग्रहाला ज्ञानपीठ पारितोषिकाची प्राप्ती झाली यातही काही नवल नाही. तेव्हा देवदुर्लभ अशा या स्वर–गंगेला आपल्या भगीरथ प्रयत्नाने पुनश्च एकदा 'जगाच्या कल्याणा'साठी पृथ्वीतलावर आणल्याबद्दल 'चार तंतू' च्या या रसऋषीला माझे सहस्त्र सहस्त्र प्रणाम.

**व्यं. ल. जोशी**

## आणिक श्रावण

श्रावण । श्रावण
देहाचा तानपुरा करून । केले स्तवन
कैलासाखाली पडला अडकून । दशानन
सोडव । जाऊ दे त्याला । आत्माराम–भवनाला । शंकराच्या
हर–हरी एक झालेल्याच्या । दवन । अर्पण केले । चरणावर
चैत्रात जन्मलेल्या श्रीरामाच्या । निराळे कशाला हवन । हंपी
विरुपाक्षाचे
कोपऱ्यात पडलेल्याचे नको । तुंगा । भद्रा
यांचे प्रवाह–सूर जुळवून । गाणे म्हण । अंतरात्म्यात गाणाऱ्याचे

हरहर श्रावणात आला । आणली श्रुती
हरिहरि श्रावणात आला । आणली कृती
तुम्ही मायबाप आमचे
मूल मी तुमचे
स्कंदाची शाखा आमची । नारदाची शिखा आमची
उभे गंध । आणि । आडवे गंध
हा कोण बरे मदन आला ? । शिव–शक्तीच्या मधे
उपटसुंभासारखा
वसुदेव – देवकीच्या गर्भात । राहून नवमास सुखात
केलेस बंधमुक्त त्यांस । जगत्पिता तू खास
सुरासुरांची खोड मोडून
ये बाबा साजशृंगार करून
श्रावणाच्या श्रवणाला हवेच का हालअपेष्टांचे तोरण ?
भ्रमरा । भ्रमराम्बा । आमची तुमची जन्मभूमी
माहीत नाही का रे कुचकामी ?

रोमहर्षण, रोमहर्षण, करतोस का बरे आवरण ?
‘कवी नसलेल्यावर टीका करणारे कोणी आहेत ?’
म्हणाला नृपतुंग
श्रीविजयाचा लिंगसंग
श्रुती बावीस । कृती हजारो खास
तण निःसार, टेकाडा टेकाडावर मोर
विद्युद्रेखा । मेघाडम्बर नौका
सारी गंधर्वनगरी । हसरी हसरी
हसरी मयूरी । भर दुपारी
श्रावणात अभिजियोग
काव्योद्योग.

## *पुन्हा श्रावण आला*

श्वेतारविन्दा, रक्तारविन्दा
श्रवणा ऽ – मघा – योगाला आणले
पुन्हा । श्रावण आला.
" तरंगाला कुठली सीमा ?
 मैदानाला सारे सारखे !
मूळ होऊन समरस होणेच कार्य –
 हे आर्य " म्हणाला.
' विश्वं आर्यं कृण्वन् '
' अमृतस्य पुत्राः '
' ॐ देवाय जन्मने ! '
देव–मानवाचा संबंध
मुक्तीपलीकडील भक्ती
भगवत् सृष्टीचा बंध
 साम–प्रबंध
वृन्दा, वृन्दा, वृन्दा
वृन्दावनाची शोभा । चांगली
ही रासलीला म्हणे ' Global '
भूमंडल – देवाचे घर चांगले
करू नकोस मीनमेष
भरूदे पूर्ण कुंभ । सिंहात रवी आला
धनिष्ठानिष्ठा । वसूना प्रतिष्ठा
शतताऽरकाऽ वरुणाचा बळकट पाश
अधमाऽ मध्यमाऽ उत्तमाऽ
तमसस्परि हरिहरि, प्रस्तर हरहर
 म्हणतात अजैक चरण

एका पायावर चांगु–भला
भद्राकरणा, चंद्राभरणा
भालचंद्रा, एकदन्ता, बीळ, उंदीर, तडफड
तद्धितान्ता, कृदन्ता, वक्रदन्ता

स्वभावोक्तावक्रा । वक्रतुण्डा । सोंडेने
गोल । आवळून बांधले मोदक, मकरन्दा
मज्ञा, भला, बाप्पा, शिव–शिव म्हणाला
हस्ता, करा, शुण्डा, किष्किधा, मोहरींचा गजानन
करतो वातापीचे समाधान
विघ्नकर्ता, हर्ता
करूदे नाहीसा मूषकदोष
हे यक्षा, यज्ञा, सर्वत्रा ॐ कारी
वाळवंटातील रहदारी भ्रांती सारी
मृत्तिकावती । धूलिधूसरा
सदाऽ उदयोन्मुखा सूर्या
निसर्गा, विसर्गा, भर्गा, दुर्गा
हेरम्बा श्रेष्ठा महोदरा
आनन्दा । पूर्णा
कृष्णाच्या हातात देता झाला । हा चन्द्रभट्ट
सावित्रीचा कमरपट्टा

संपली रात्र चांदण्याची
सूर्याची ममता पहाटेची
बोलावते आहे माघा मघा मघा
घमघम गन्ध
आला अरविन्द

अग्नि–सोमासाठी सामरस्य आणता झाला
‘ श्रावण आला । कान उघडे ठेव ’ म्हणाला.

## *प्रसूती*

मूर्धन्याच्या तेजातील
कुठलातरी एक किरण
झाला आहे सुवर्ण
श्रुतीला आभरण
ऋषीने खोलली
हृदयाची गवसणी
' लुसिका ! लुसिका ! असे म्हटले '
वीणेच्या तारा छेडल्या :–
" समजून घे – रहा–हरि हरिहरि हरहर
गिरगिर फिरत उतरून ये धरेवर, घटकाभर''
— म्हणाला, आला जवळ
तेथेच शब्द विश्रमित मौनाच्या पदरात
        अंत:करणाच्या संकोचात
ये, रसिका, धुके दूर कर
        तमाचा संहार कर
कवन भगीरथ – रथ
        तुला आहे सारथ्य.
हितकर असू दे सरणी
        सात्त्विक पथ्य
इथे एक तिथे एक
        नीरव आकाशात, करूदे नृत्य
        हो ! हो ! पावन कृत्य
पावकस्तुत्य, होताऽऽ दे दे आता
        घमघम गंधाचा मार्ग.
        गंधर्वाचा स्वर्ग.
काकूस्वरात स्फुरणारा लौकिक अपवर्ग
तेजाच्या गतीत प्रियतमेचे वैभव
        अर्थ – शब्दांची संयुती
        सद्भावाची प्रसूती.

## चार तंतू

९

गोमातेच्या वरदानाला
मी–पणाला आणि तू-पणाला
दृश्य आधार व अंतिम पाया
तालबद्ध स्वर–शृंगार–ज्याया

तू आणि मी यांमधून फोफावणाऱ्या
या 'तू'ला आणि 'मी'ला
आजार संभवतो कोणता ?
ना येत मजला ओळखता

सुभग अशा या तंतूच्या
पदापदांच्या प्रतिभेतून
झंकारत राहतात
चार मधुर स्वर नूतन

संघर्ष आहत नि अनाहत स्वरांचा
आणि झगडा विरोधी हक्कांचा
यांचा शेवट होतो खचित
पहा संगीताच्या सरितेत

वस्तूच्या मूलाधाराचे ज्ञान
आवश्यक तज्जन्म–शोधन
त्याच्या खरेपणाची आठवण
ठेवावी लागते मनात साठवण

२

गोमातेचे वरदान अशी
नौकेवरील ती पोरगी
आली पहा कुडकुडत
नि वर डोळे मोडीत

परिचित नि पाशवी
अपेक्षेची प्रीत न्यारी
शून्यातून विणलेला
पेहराव भर्जरी

स्नायूंच्या हालचालीमुळे
रसवंती भिजली तर
तीमधून झंकारतात
शब्दांचे सप्त स्वर

अस्पर्शित आकर्षक
अजात अशा जाताला
मधुर मधु–सिंधु
खरा आप्त-बंधु

विषयवासनेचा व्यवहार
गर्भारपणाचा अंकुर
गुप्त काय राहिले ?
मला नाही समजले.

भूतकाळाचा भाव
भविष्याचा ठाव
यांना स्तनपान देते
नव्या प्रतिभेचे काम ते

३

'टाकशील थेंब तर मरशील फुकट
असे ओरडणाऱ्या भूत नि भविष्य काळांना
न जुमानता चित्रा पाऊस थेंब टाकतो
स्वातीच्या शुक्ति – शिंपल्यात.'

हे जग, आईबाबांचे पोर
आईमध्ये बाबांचा चेहरा थोर
आईचे जू बाबांच्या मानेवर
आणि मी आहे पोरगा त्यांचा
असे म्हणते 'श्रीगुरुदत्त–वाचा.'

४

'मी' 'तू'
'पोर' 'परमेश्वर'
हे फक्त चार तंतू
गाण्यासाठी तुम्ही छेडा
अगर तसेच ठेवा
हत्तीप्रमाणे मूळचा ॐ स्वर तेथे हजर
गणनायक विद्या–सुर
मायेतून जन्मलेले हे शरीर
कोकराच्या डोळ्यावर नेम धरते
धनुष्याला प्रत्यंचा लावते
परतत्त्वाची भाषा बनते.

## अणु-महत्

9

‘ शून्यात लोकोदय
शून्यात लोकलय ’
बुद्धिशून्य गर्जला
होता तसाच बुडाला

गलन आणि पूरण
जीव आत पुरण
जीव प्राण
प्राण जीव
लोकापलीकडे शून्य
लोकच अनन्य
लोकोत्तर व्हावे
लोकोत्तम जीवाने

लोक–देह–लोचन
ज्ञान–स्नेह–शोषण
अग्नीला आहे अस्त–उदय
प्रलयच त्याचे आलय
कसले भय ? सदा अभय

सत्त नावाचे अंडे
तेल पणती वात
अधमोत्तम मध्यम
बुद्ध–धम्म–संघ सम
विषमात शून्य
विरक्त क्षत्रजन्य

२

स्थलच चलित झाल्यावर
पेटत राहते लोचन
जड जळून, पाणी साचून
पाहिले भक्त–मोचन

कन्नडच दृष्टी होऊन
दृष्टीच आरसा होऊन
दिसलेले पाहिलेले एक झाले
अस्तित्व त्यातच होते
ज्ञान ज्ञानातच होते
अस्तित्व, ज्ञान, प्रगती माझे झाले
तेच पुढे निघाले, हेच मागे राहिले
मधे तुझे झाल्यावर डोह झाला
माझे तुझे एक, डावे उजवे अपवित्र
टाळूविळूला दीर्घ शिवसूत्र
आत असलेला अगस्त्य
बाहेर असलेला पुलस्त्य
आत–बाहेर पिकल्या केसाचा संभार
बिंब मूर्तीचा शृंगार, सच्चिदानंद
पंडिती भक्तीमुळे शल्य झाले
ग्राम तिहींचा दीप
प्रकाशित कर श्वेत द्वीप
विठ्ठलाची कटकट सूत्राचा आधार
उपनिषदाचे सार

देव तेजाचे जल
नारायणाचे वासस्थल
उर्वशीच्या गर्भात मित्र नि वरुण
त्या वसिष्ठाचा आणि त्या अगस्त्याचा उदय
आठ वसूंची गाठ, पक्की झाली

एक सत्तावीस, पुढे सदतीस
छत्तीसात त्रेसष्ट
एका शून्यामागे,
भव-भाव सामर्थ्यानेच
शंभर शंभरातच होते हजाराचे शहर
मातुः सरोवरातील
अरविंद उमलल्यावर
साऱ्या गंधद्रव्यात विभूति-बुक्का
ताल नाद लय
शरीरच महिमामय
जीवरस भावरस समरस होऊन

ॐ ज्ञं नमो ॐ । हुंकार शंख
नभात हंस । शीर्षावतंस
नंदी आनंदी । तू शिवाचा बंदी
हे हनुम प्रणमा । समनमन अममा
गरुडाने पंख पसरून । आकाश व्यापले
गणपतीच्या उंदराला । गुळाचा सापळा
शिवनागबंधाने । तारक-संहार केला
काम कमनीय । राम रमणीय
समोर आहे इंद्र । सूर्याला हा चंद्र
नाभिराज ब्रह्मदेव । चिमटा घेतलेला महादेव
उन्निद्र मीन । आपल्या स्वाधीन
वासुदेवाला शेष । क्लीन्‌ला का क्लेश !
अष्ट दिग्गजांना । आधार जल त्यांना
कूर्म रे कूर्म - ऱ्हींप्रेम मर्म
ही श्वेत कृष्णा । होऊ दे वितृष्णा

भक्ति-माधुर्यात प्रेमशक्ती
श्रीकृष्ण–राधेत रंजक विरक्ती

## *आपली आठवण*

कागद–पेन्सिलीच्या तडाख्यात पाय काळाचा
सापडून धडपडताना दावे तुम्ही तोडलेत चाचा
वासराला खेळवल्यागत तुम्ही नाचवून त्याला
संतोषला आणि संतोषविले करुणार्द्र डोळ्याला

वीर चिंतका, तुमची तपस्या बुद्धीला गम्य
तुम्हाला तुम्हीच पूर्वपक्ष अक्षर-रम्य
गाठोडे बैराग्याचे मधे वाटेतच टाकून देणार ?
आम्ही येऊ कर्नाटकात ! म्हणे तुम्हीसुद्धा येणार

पै अन् पैचा हिशोब दिला ? पटले गोविंदाला?
मी आठवत राहतो कस्तूर्यादि परिमल द्रव्याला
बाहेर धूर नि राख, आतल्या आत अग्नये स्वाहा
तुमच्या जिज्ञासेला आहे का अंत ? शब्दाला
आदि ? पाहा
तरुणांना आशीर्वाद दिला, असूया झाली दग्ध
कालज्ञानी ! मुग्ध ! अक्षरस्थच ! विदग्ध !

## देवुडु

बालकसा देवुडु । उन्मत्तसा देवुडु
जड–पिशाच देवुडु । मूर्खमंद देवुडु
जीवनच नाटक । आपणही प्रेक्षक
खेळ का पोरखेळ ? । वायफळ, देवुडु

पडला, धडपडला । झुंजला देवुडु
भटकला, जुगारला । कडमडला देवुडु
लंगडत निघे ऐसा । वैकुंठा देवुडु
अंधाला दिसले ना । कैलासच देवुडु

वेदतीर्थ, बुड्डनगिरी । बोलावे वन कदली
किंचित्‌हि कार्याचे । ज्ञान हवे देवुडु
देवाला तू न विसर । गुरुशी हो एकरूप
विनयशील वृत्ति सदा । आवश्यक देवुडु

सर्व क्षेम, सर्व योग । इंद्रभोग देवुडु
येन केन मिळते का ? । मेनका पतित्व ते
सावित्रि–गात्र कुठे ? । शकुंतला सतित्व ते
भिक्षाटन ना सुटले । शिवरुद्रहि जरि भले
विरहयोग विरहभोग । गौरीला ना चुकला
अवतरणा, उद्धरणा । जीवन सोपान खरे
क्रोध, शाप, देवताप । पावन ते तप सारे
उमजु काय, समजु काय? । लीलेला काल असे
तारणे नि मारणे । ते मायाजाल असे
नहुष, याज्ञवल्क्यजवळि । समित्पाणी देवुडु
ब्रह्म–क्षत्र कुरुक्षेत्र । ते पवित्र देवुडु
स्तंभातहि बिंब वसे । श्रद्धा ही देवुडु
कुंभ रिता म्हणता— । मैदान रिते ? देवुडु

*श्री विवेकानंद-शिखर-प्रगाथा*

१

गौरीशंकर इथे । इथे कांचनगंगा । त्या तिकडे परमहंसाची स्वारी
आत्मक्रीड:, आत्मरति:, सच्चिदात्मविहारी, पाउले न उमटणारी रहदारी
पाहा ! विवेकानन्दाने दाखविला मार्ग, उदार भारी । शिखरावरून
शिखरावर झेप घेणारी स्वारी

हा मार्ग, अनादी, हृदय संवादी
सुनादी, सरगम सनादी, विज्ञान-बोधी
संज्ञान--संबोधी :

" सह वीर्यं करवावहै
तेजस्विनावधीतमस्तु, मा विद्विषावहै "
" समानि व आकूति: । समाना हृदयानिव: "
नि:पक्ष वेदान्त, पूर्णबोधान्त; हा स्वयं सिद्धान्त
परमामृतांबोधी

२

' नन्दी मी । आ- । नन्दी मी । तो वृषभध्वज, बैल म्हणून
आलो मी शिवशक्ती खांद्यावर घेऊन
बैल ? बैल नव्हे हा - वांड खोंड ! आपण । वेसण तोडून
' उंच काठयांच्या जत्रेत जमलेल्या जनसामान्यांत घुसून पुढे जातो,
होतो विमुक्तांचा संबंधी

ती-विवेक लहरी, प्रति प्रहरि, प्रहरी
पळापळाला घट घट प्रस्तरी, ही मलापहारी
नन्दकन्द-लहरी ! स्कन्द शिलालहरी । स्वाऽनन्द लहरी ।
नि:स्वानन्द लहरी ।

३

द्वैताद्वैतात साकार होत होतो, मी बुडत होतो, निद्रा निद्रा–स्वप्नहारी
सत्प्रेमालापनयुत नटनर्तन, पाण्डुरंगि श्रीरंगी रंगुन
मौन मुद्रा आराधून, श्रीचरणाला बिलगून
ऋभु होतो, तो भूऽ म्हणून मी प्रभुही झालो होतो
विभु होऊन, जन्म घेणार होतो, हो ! अतीत भूमीला समान
असा मी उद्भवलो होतो
नर–नारायणांची विद्या शृंगेरीच्या कडेकपारीत
श्रीशैलेलाही पोहोचलो होतो, कल्याणही निर्माणिले होते
तिरुमलेलाही पोहोचलो होतो, उडुपी निर्माणिले होते
हृदयंगम आळंदीला गेलो होतो, पंढरपूर निर्माणिले होते
भरतखंडाच्या उत्तर सीमेला, ध्रुवमंडलाच्या शिखराला
गोमट होऊन धडकलो होतो
कन्याकुमारीत डुंबलो होतो––। काश्मीरला गेलो होतो।
श्रीगुरुसमीप होतो
नन्दी मी। आ–। नन्दी मी, तो वृषभध्वज बैल म्हणून
आलो मी शिवशक्ती खांद्यावर घेऊन.

४

स्वयंभू, स्वयंभू, स्वयंभू हे परिभाविन् कवे––मनीषिन्
ईशावासला शेष होऊन। बलरामाकडे अभय मागून
धडाडत अग्निज्वाला ! श्रीकंठाच्या शंखास अनुकूला
ॐ, ॐ, अं, अः सो ऽहं हंसः
ब्रह्मरंध्रात, सहस्त्रारात, मातेच्या उद्घोषाचा संतोष
आऽ आऽ आऽ नन्दी। ऊर्ध्वगती घेऊन
अगे कामधेनु। झालो मी नन्दी
चिंतामणीला डोके घासले होते, कल्पवृक्षाच्या वनात घुसलो होतो,
अप्सरांच्या मेळाव्यात सापडलो होतो,
'श्रीगुरवे नमः' म्हणालो। हिमालयात आलो
उमा–यक्षींना साक्ष ठेवून। आ। श्रमात विरघळलो होतो
नदीप्रमाणे निनादणारी ती दिव्य ध्वनी ऐका। उठा, उठा, उठा
उंची गाठा, उत्तर गाठा, ते––निरूपण ऐका.

९

अहं म्हणून मी धुमसत होतो
नन्दी मी तेव्हा समजत होतो
आनन्दी । आनन्दी
शिवरहित ती शक्ती कोणती ?
भगवन्महिमा–भक्ती ही ती
देहातच नि:संदेही मी
देहली दीपाचा सुस्नेही मी
वात झालो ! भस्मसात झालो !
फुलवात झालो मी
नन्दादीपाचे टोक । निर्वाणाचे मार्गदर्शक
तेव, तेव, तेव तरी, दिक्करीऽऽ
शेष-फणा-मण्डल संचारी
कूर्माच्या पाठीवर नाचणारी नारी
ही, कोण बरे ही ? हंसाची स्वारी ! शुक-वाणी-लहरी
त्रिपुरा नगरीत चमकणारी निहारी
भक्ति–हृदय–कुवलय सुविहारी । रासलीलेत पदक्षेप भारी
पुन: पुन: अवतारी । उद्धाराची ही रहदारी
पायऱ्या बांधून, तलावात शिरून, हृत्पुंडरीक प्रवेशून
उमलविणारी प्रभात–'फेरी'
भृंगाभृंगाच्या गुंजारवात, विसावला प्रविवेकी
श्रीरामकृष्ण हरी, रामकृष्ण हरी, बिलहरी सावेरी
कावेरी असावेरी
निर्वितर्क ओलांडून, निर्विचार उधळून, अस्मिताही प्रकट करून
(आनन्द–लहरी)
कंठसूत्रकारी, पत्र आणले भारी
शारदामणी—कंऽ । कणण झणत्कारी । कुंऽकुमित पताकाचाऽरी
श्रीरामकृष्ण हरी, रामकृष्ण हरी । जंऽ । गमित निराभारी

६

परवा परवा होता, पंचाग्नि सिद्ध, सभ्यतेला हा बद्ध
'ॐ भवति' म्हणून जोराने भारी
माऽ। नवतेच्या हृदयात शिरून। स्तुती करता झाला।
दैवाचा प्रतिहारी
ॐ तत् ठेक्यात चालला संन्यासी
नवयुगाची पसरून गादी खाशी
स्वच्छंद उपन्यासी

"संगच्छध्वं संवदध्वं संवोमनांसि जानताम्
देवाभागं यथा पूर्वे संजानानाऽउपासते."
हा वृषोधर्म, अधियज्ञकर्म
ही शान्तवीर-गाथाऽ। प्रगाथा दण्डकानुकारी
सदयहृदयहारी। संवित् चकोरी। ही साम-एकतारी
ॐ मनन तनन श्रीगुरुध्यान। अंबिकातनय-तान
ह्याला नाही अनमान ?

हृदय-श्वास घास, तीन वेळा खास
आनन्दी मी, आनन्दी मी तो वृषभध्वज बैल म्हणून
आलो मी शिवशक्ती खांद्यावर घेऊन
आजच न विसरून.

## वाट्याला आलेले

'बेंद्रे'ची दुर्दशा – ती दाही दिशा
लाभण्याजोगे लाभले नाही
ओल्यातच वाळलेले, नासून निरुपयोगी झालेले
आहारात आटलेले, आंबट नि तुरट
कदान्नही झाले पक्वान्न
पक्वान्न होते अपक्वान्न

घाम गाळून मिळालेला तेवढाच फायदा
बाकीचे जीवन म्हणजे नुसता तगादा
हुंकार, ठंकार, शंखाला शंख
(शूराला कशाला पाहिजे तो नखरा ?)
भोवतालचा दाह, शीतलतेला मारक खरा

माझ्या कक्षेतच माझे परिभ्रमण
बाहेरचे नुसते आक्रमण
डोहाळे की सामरस्य एकसारखे बरसणारे
तीर्थ–अक्षोभ्यतीर्थ
गुणलेला गुणाकार, भाज्य, भाग्य
खाल्लेले भोग्य
टाकलेले उष्टे खरकटे, स्मशान वैराग्य.

## अहम्-इदम्

अरे, अरे, कसला हा आरसा !
माझा चेहरा कुठे ? हे प्रतिबिंब कुठे ?
समोरचा हा चेहरा......
का चेहेरेपट्टीची चेष्टा !
राठ केस, उघडेबोडके डोके
कपाळभर लहान-मोठ्या रेषा
भुवया अशातशाच
धुरकटलेल्या डोळ्यात अंगार असेलही कदाचित्
मिशाचे मोकळे मैदान, ओहो ! इथे आहे नाक
जाड, पुढे आलेले, फाटलेले ओठ
हनुवटी कळाहीन, नुसती अवकळा.
ही कुठल्या मुद्रेची विद्या ?
हा माझा चेहरा ?
बहिर्गोल आरशात भूतचेष्टाच हवी काय ?
होय, मला दिसलेला माझा चेहरा सावलीत, हाय !
तरीही त्या चेहऱ्यात नि या चेहऱ्यात जाताजाताचे साम्य
'तो चेहरा माझाच का ? होय !
तर हा चेहराच नव्हे !'
समोरील चेहऱ्याने म्हणे धाडली चाहूल.
प्रतिबिंबातून आला का प्रतिध्वनी ?
एडक्याच्या टकरीत, 'अहं अहं' चा सामना
व्यक्तीव्यक्तीमध्ये दुरावा.
सुविचाराच्या अभावाचे कारण खरे
आंगबळापेक्षा अकलेचे बळ बरे.

## *उक्ती-कृती*

उक्ती–उक्तीच्या टकरीत उक्तीची होते राख
मनामनाच्या मंथनाने मन्मथाची निर्वाणगती
कानावर पडणाऱ्या मंत्रांना ना शेंडा ना बुडखा
तुंबुरच निद्रिस्त झाला तर तंबोऱ्याची काय स्थिती ?

स्पर्शाने जागे होऊन दर्शनाच्या प्रकाशात
दिसला, नादमार्ग, मरणांचे माहेरघर, निधी
डोळयांच्या उघडझापांत नक्षत्रे दिसतात ?
त्या तिरोभावाला चुकत नाही अनुग्रहाचा विधी

यज्ञ प्राजापत्य; ब्रह्म सु(षु)म्न स्पंद
देवमानव मार्गाला समन्वित सु-रीत
भाऊबंदकीतच बंधुभावाचा बंध
हृद्देवाला भक्तीने आळविलेले गीत

केवळ नाद काय कामाचा ? उपयोग काय स्फूर्तीचा ?
शब्द श्रुती झाल्यावर कृती होईल वाचा.

## नाद मयूर

प्रकाशाच्या रंगाने चितारले विद्युच्चित्र
सजवून ठेवून दिले, काय हे विचित्र ?
(वर पिवळा लेप, नसता आत वचनसूत्र!)
प्रज्ञा प्रतिभापुष्प तर संज्ञा कांचनपत्र!

प्रस्फुरक दीप्ती झगमगून उघडते डोळा
सात जिभा पसरते अग्नि-शिखा-ज्वाला
व्यर्थ नाही का बाबा कुंचला—
पाण्याचा रंग ?
सुवासिक मातीपुढे का फुसका वायुसंग ?

कर्णरंध्रात शिरुन मौनाच्या डोहात मुनी
मुचकुंद निद्रिस्त व्यर्थ गाढ ढोरावाणी !
ग्रहगोल—संगीत-तानांचे स्मित मंद
भाव परिस्पंद आत्मा आत्माच हा नंद

वाच्यवर्णाक्षरांत अद्भुत मयूरकेका ?
श्री अनिर्वाच्याला नाही भाष्य, ऐका.

## *जे न देखे रवी*

जनगहनात मृगामृगांची पाऊलवाट
शयनाला गुहा, जागे करते रिकामे पोट
प्रयासाने शोधून स्वत: पाहिलेले स्वप्नच स्वर्लोक
भिथुन नित्याची वंचना, मृगजलच रस एक.

अभ्राच्छादित आकाश झाल्यावर शुभ्रवर्ण
काळोखात वांझ गाय बांधल्याप्रमाणे हे भर्ग !
वाऱ्याला नुसते मैदान वाटे श्वासच प्राण पूर्ण
मुंग्यांच्या मागे मुंग्या सध्या सर्ग अवर्ग.

भूतमात्रांचा अर्थ कोणत्या भुताने गिळला ?
इंद्रियांचा नि इंद्राचा वियोग कधीच झाला !
करकर वाजणारे मौनाचे बीळ भ्रमरोत्पन्न
कोणत्या ब्रम्ह्याची ही लिपी—सदसन्न ?

आत्मा म्लान दिसतो, तो त्याचा स्वभाव
ज्ञान मृत भासते तेथे विचाराचा अभाव.

## सादृश्य

ही भिंत; तरीही तिकडे पाहा अशीच एक स्मृती
उसटल्यासारखी, विस्मृतीच्या पडक्या जागेतील कृती
तऱ्हेतऱ्हेच्या सुबक मूर्ती आहेत डोकावत; भूमीने या
पाय खाजविला ? काहीसा अस्पष्ट, तो बिंदू पाहू या.

हा ठिपका जिकडे पाहतो तिकडे आकार
साकार होऊन मुद्रा, मुद्रेवरील भाव तयार
पडदा सरकल्याप्रमाणे इकडे तिकडे पाहिल्याने
उद्भवला इथे हा भाव कोणत्या कामेच्छेने ?

हा घुणाक्षर न्याय ! किडयाने खाल्लेली ही प्रीत
माझ्या मानस-मेघातील एक भृंग विपरीत
पुन: पुन: उठून आतुरतेने घेत आहे चुंबन. चाहूल ऐक
इकडे डोळयात बाहुली, तिकडे बाहुलीला डोळा.

कुणीही कोरलेले असो; उलगडलेले असो हे सादृश्य
या अदृष्टाचा दृष्टि–लाभ दृश्याला अवश्य.

## ऊहा

डोळ्यातील बाहुलीच्या छिद्रापलीकडील प्रकाशाची गुहा !
रुपेरी पडद्यावर सुंदरसे विराट विश्व, पाहा !
आठवण, स्वप्नांच्या दरीतील जनस्तोम !
तेजाच्या उदरात : हे पाहिलेला कविसार्वभौम.

ना दूध, ना वाटी घोट गोडगोड थोडा
निर्विषय अशा सृष्टीत भोग आत्मक्रीडा
वासना संजनित संस्कार जिभेने चाटून
भागीरथीचे तेव्हा अवतरण जान्हवी होऊन

हे विचाराच्या ओढ्याच्या आत शिरले नाही;
अंतरिक्षातील पक्षी पाहतो आहे क्षितिज
नुसता उमाळा, घोटाळा, वाऱ्याला साध्य, सहज;
भावभावनांचे कापटच जाळ्यात अडकले नाही.

जीवनाच्या रंगमंचावर भरतनाटच्युग
ओहो ! आहा ! ऊहा ! नूतन ईहा मृग

*मैदान*

दृश्य आणि अदृश्य यांमध्ये लक्ष्मणरेषा ओढून
चंचल मन आणि त्याच्या शब्दांचे शेपूट धरून
वाढ न होता मृत कल्पना सुस्त पडून राहते,
पण त्या ध्वनीतच काहीतरी वाढत असल्याचे दिसते.

भोके नसलेल्या मोत्यांची रास वाट पाहते
सुरेखसा मौक्तिक - हार होण्याची इच्छा करते;
मौन अस्फुटित विद्युल्लतेच्या हृदयात असते
आपण तमसाव्रत याची प्रकाशाला कल्पना येते.

जे आहे ते असते, जरी झाकले तरी दिसते
अनोळखी अक्षर अनाहत नाद मिळविते,
आहताच्या बंदिशाळेत सहज विमुक्त होते
निर्बीज न होता आपले स्वत्त्व राखते.

सूर्य सीमा ओलांडताना मैदानाची होते बाग
शेणीने नव्हे तर हृदय-काष्ठांनी तयार होते आग.

## नटराजास

हा स्पर्शरोग, अरे, संसर्गजन्य हा हात,
वेदनेचे व्रत, संवेदनेचे हनन, संजनन
सत्संगालाच हरवून बसलेले हे जीवन,
ही शुद्ध मरुभूमी. भीष्म शरस्पर्शात

गंगेच्या इंगिताची अनभिज्ञता, त्याची घोर चिंता,
पाताळ वामनाचे पदतल, बलीच्या मस्तकाची अगाधता;
ना नाक, ना नेत्र, ना कर्ण, हृदयाच्या स्पंदनाचे डमरु
तिमिरांधकाराच्या कालकूटाचे उधळलेले वारु

वेदनेला आहे वेग, शिवणाऱ्या सुईच्या हाताला
विच्छेदनाची मनीषा, भेद तेथे अभेद
सीमंतिनीची शिवरेखा, चांगभला !
माझ्या उत्साहाला तुझे पादच सुपाद.

खणेल तेथे वेताळ —— अपाय
अनाथ असा मी अंध —— तू वासरहित गंध–काय

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
2898
22849

## बिच्चारे दृश्य

बिच्चारे ! उकिरड्यावर पडले होते पातकासारखे
कुण्या गावभवानीने ही कामगिरी केली ?
केळीच्या पानात गुंडाळून ठेवला हा कोवळा जीव !
ज्याला त्याला आपलीच रीत प्यारी; हा कुणा–
    मर्दाचा नाकर्तेपणा ! गर्भाला पतन हे स्वाभाविक
मग अपत्य सुलभ वात्सल्याचे काय ? शोक मात्र अबोल
का दिसू नये या जगाला ? का सारेच धृतराष्ट्र ?
भयभीत झालेला पिंड बीभत्सपणाचा भूदंड !

आमच्या पापाप्रमाणे आमचा कोपही अविवेकी
दुष्कृत्यावर दयेचा वर्षाव हवाच हवा.
विषयवासनेत खऱ्या प्रीतीची वजाबाकी
बीजबिंदूच्या अंतर्भागी का बरे विचवाची नांगी ?
गर्भावताराலादेखील अनिवार्य प्राणोत्क्रमण
हे अनादी दृश्यच मनस्तापाचे खरे कारण.

२६७६
१५३२८
[illegible]

## योग

कसल्या कसल्या लोकांना चिंताग्रस्त केले
या योगाने ! होणारे होते, जाणारे जाते.
आत पाहणाऱ्याला जे दिसते ते
भयभक्ती उत्पन्न करीत उद्‌भवाकडे निघून जाते.

एकूण काळाचे पुण्य ! असेच का ? तसेच का ?
अशा तर्कबद्ध विचारचक्राला सुरवात होते.
कर्मश्रुत धर्मफळाची काय म्हणून चिंता करावी ?
तरीही ' कृपा ' निश्चित; तीच जगाला नमविते.

कार्याला कारण शोधणे योग्य का ? आठव बाबा
कर्त्याला ! तुझी सारी आपत्ती त्यासाठी
विक्रियेचे जीवन होऊन, नाहीशी होते, डोळे उघड
आणि 'अकुतोभय' होऊन जागृत रहा बाबा.

हूल उठवीत शिळेने चालविली आहे नुसती लूट
मानवाचे भविष्य शिल्पकारांच्या हातातील दगड दीड फूट.

## इंद्रपद

'देहि !' म्हणणाऱ्याला 'न' 'नहि' म्हणेल का बली ?
देणाऱ्या दानवाचा हात वर, घेणाऱ्याचा खाली
अणुरेणु व्यापून विराट विश्वाला पुरून उरलेला पुरुष
पुरुषभर पाण्यात पोहणारा हा पुरुष !

शुक्रनीतिशास्त्राला पूर्वापार एकच डोळा !
उच्चस्तरावर सौंदर्य न पाहणारा सूर्य, आंधळा
अहमन्यतेच्या दिमाखाला नाही कवडीचे मोल
जीव गलितगात्र होऊन, उरले ते मातीमोल.

अजून आहे पाताळात बलीचे बीज शाबूत
जगणारा जीव अभाव नसणाऱ्या सुस्थितीत
उद्भवून कोंब फुटतील ह्याला त्याला रुढीत
हरिहर राहतील द्वारपाळ ? ते, बंधुप्रीत.

कलियुगात अमाप पीक ! या कृतज्ञतेचे स्थान
भविष्याच्या अतीतात बलीला इंद्रपदाचे दान

## बॅबेल

संधान ? सामना ? त्रिकुळ संघाचे कूट ?
हरि-हरी ! हर–हरा ! भक्ति-मोक्षांत फूट
भांडणाऱ्या दोघांत कोण होता जागृत ?
रामरावणासाठी वानर होते भांडत !

केरळ नि कुंतलाला दुष्ट बुद्धीची गाठ
कर्म, याचे एकदा, त्याचे एकदा, कर्नाट
शबर-आंध्र-पुलिंद-पौंड्र-पुल्कस-सामना
पहिल्यापासून हाच मार्ग द्राविडांचाही, होय ना ?

सुवर्ण लंकेचीही वाचा गेली की काय ?
मंदोदरीच्या भ्रमाचा फुटेल भोपळा पिकून का
किक्रान्तीसाठी, पौलस्त्याच्या पिंडासाठी छळ
रावणाच्या उपवनात माकडतोंडी कच्चे फळ !

बॅबेल घुमटाच्या आत गोंधळाची आहे साथ
बेरडांनी वेढलेली शिकार ही ‘ उद्धट ’ तो ‘ लाथ’ .

*घाण*

रती विधवा झाली म्हणून उठली एकच बोंब
शंकराच्या डोळयात होता आगीचा भयानक डोंब
कामपौरोहित्याला लागू दे एकदाची आग
हे यक्षिणी ! हैमवती ! काय झाले बाई, सांग.

‘कुमारसंभवा’साठी केवढा हा अट्टाहास !
देवविजयाचा आहे हा मयूरनाद खास
असुर झाला भयभीत, उलघाल शेळीची चाले
शिववीर्यनिर्मित पिंड, रासवट मदनाचे चाळे ?

चैत्ररथात वसंताचे नेहमीच आगमन
आम्रपल्लव तोरणापुढे कोवळया कैऱ्यांचे सदन
चंद्राला शुकपिकांना तसेच चारणभाटांना
मदनाचे अनिर्वाच्य प्रेम झंकारणाऱ्या ताना

‘हय्यारे हय्या’ हाक, धाप, खताचे वाढते प्रमाण
शेताच्या बांधावरील दगड बाराही महिने घाण

## प्रबुद्ध

“ही तप्तमुद्रा, या तीर्थाच्या सिंचनातच
अंत:पडदा दृष्टी आणि दूरदृष्टीच्या मधेच
कृपेची विद्युल्लेखा कृष्णरेखेला भेदून खोल
चित्र कापून टाकील : ऐकून मृदंगाचे बोल,

अरे खुळचा ! मागे फिर; इथेच संपला रस्ता
का सोडलीस आशा मरुभूमीत झरा दृष्टिपथात नसता?
तत्त्वाच्या अंड्यात गेलास मरून स्वत्वाची कल्पना येण्यापूर्वीच
वासना साऱ्या छपून राहिल्या तुझ्या आसनातच

प्रलयमेघ दुवळा, त्याने आरती लावली
त्या प्रवाळाचे पालुपद ध्वनी उंचावून
पिऊन टाकील शब्दागणिक पौरुषाची कथावली
हयवदन होऊन दे, रसपयोनिधीत प्रवेशून.

मी कल्की झाल्यावर ये माझा हरी होऊन
तोपर्यंत लपून बैस अष्ट दिग्गज होऊन.”

## डू-ड

शंकराने डमरु वाजविला
पहिला शब्द बाहेर पडला
डम्, डम्, डम् आवाज झाला
हा ड-वाला गांवाकडला
बोलाव त्याला.

हु, हू, हुम् म्हणणारा
हुंकाराकडून ॐकाराकडे जाणारा
माहूऽ, बेहूऽ, नीहूऽ
या हु-हूला फुलविणाऱ्याला
परत बोलाव त्याला.

ककू, ककू असे कोकिलणारा
कोकिल-मोरांची नक्कल करणारा
ऐक एक हाक म्हणणारा
ह्या 'क' ला झोके देणाऱ्याला
ढकलून द्या त्याला.

यमयमीच्या संवादाची करणी
ज्याची, त्याचीच आमची विचार-सरणी
हा ड, हु, क, हुडक, दयार्द्र प्राणी
गूळपाणी आणी, बरणी
उघड पाहू तिची झाकणी.

## नोऽऽ नाऽऽ

ते काहीतरी होते
नो, नो, नो, म्हणत होते, म्हणतच होते;
डोके होते, तिकडेच होते;
नागड्या बालकाप्रमाणे होते
रडत होते, हसत होते.
दे, दे, ताई म्हणत होते
तोऽ ना ? मीऽ ना ? तूऽ ना ?
काऽहीऽ तरीऽच ?
आपण ना ? आत्मा ना ? तो ना ?
आई ना ? बाबा ना ?
कवटाळणारा नाऽऽऽ ?
चुकणारा नाऽऽऽ ?
ऐकणारा नाऽऽऽ ?
नो, पाहा, बैस, समेट कर.
नो. वेदनेवाचून प्रचीती नाही !
वेदनेची साल सोलणाराऽऽ
हा नंद ना ? बाळ ना ?
शिजले असेल ना—खाल्ले असेल ना
नो. होय. होय ना ?
काय होय ना ?
नो ? माशी ना ?
अणु ना ? गुण ना ? गुणगुण ना ?
मधमाशी ना ?
मऽऽध नाऽऽ, मेऽऽण नाऽऽ, मोहोळ भरून
राणीही नो, राजाही नो
विडा ना--त्रयोदशगुणी विडा ना
चर्वणी -- पर्वणी
णोऽ नोऽ मोऽ
नमेऽ नमोऽ चमेऽ नमोऽ
नोऽ. नोऽ. नोऽ.

## *नाम*

काम । ईशार्पित केलेल्यांनी
नाम । धारण करावे ।। गुप्त ।। नाम ।।
सुषुप्ती घालविणारी
दीप्ती लाभलेल्यांनी । आप्त म्हणून प्राप्त होणाऱ्याचे
नाम धारण करावे ।। ती श्री ।। नाम
हे योग्य ? ते योग्य
म्हणून अकुलित न होता
श्रीधराचे । गिरिधराचे नाम.

नेम । होम । गोमय । लावून
श्वासागणिक नाम
प्राणेशाचे । हृदयाधिष्ठित नाम
आविष्टित नाम.
प्रेमालाच खणून काढणारे । नाम
प्रेमच ओकणारे । नाम
भुंकणारे । निंदणारे । नाम, पुरून
पुष्प होऊन विकसणारे नाम । धारण करा
हो धारणा । ही समाधी
हा संयम
हा उद्यम
नाम । प्रेम । भूम
म्हणून ॐकारणारे नाम
श्रुती रचणारे नाम
श्रुतीला श्रुती देणारे नाम
नाऽ । मऽ
असे विकसते । भूम
म्हणून सांग । माते, दक्षिणेश्वरी
भूम्ना स्नेह । ते वाहन
ना, ना, ना, म, म, म

सद्गमय
ज्योतिर्गमय
अमृतं गमय
म -- ना
अत्यंत तिरस्कृत वाच्य; प्रमाण.
अप्रमाण – स्वप्रमाण
दिव्य – स्फुटित, ध्वनित
नादाच्या सरगम-ताना । ना
अ म ना
नाम, भूम, प्रेम
भूम, भवम, संभवम
उद्भवम
म, म, म
अ ऊ म
हे ऊहागान
भूम भूम, स्वयंभूम
नाम । नाम.

## पराशर

पराऽ शररूपाऽ
शरण्या ऽ—शरणा
चेतना—अंतःकरणा
हे धरणीगंध
श्वासाला आनंद
वासना निर्मल चरण
पुण्डरीकाभरण
नंदिनी वसिष्ठामाता
स्वयं सुप्रीता.

दोहनाला तयार होऊन बाहेर ये दीप्ताननें!
अरे–अरे ये हंसा ?
फुल्लोत्पलसम राजहंसा ?
जननी—जनकप्राया
विदेहा ! निरपाया
साधनायायुर्दाया
करुणामयी भव उत्तरणे
निरावरणे करणे करणे
निर्मथनाऽ नवनीत जाया
व्याकरणे पुरे निराकरणे
शरधनुरूपा वाणी
पश्यन् पश्यन् श्वसन् जिघ्रन्
क्लींकरि सूत्राणि
शब्दब्रह्माची राणी
छन्दोगमकाच्छादने
व्यक्ता ऽ व्यक्ता
अनुग्रहं कुरु—सदने सदने

विश्वं चरन्तिऽ
अभ्रान्ताऽ शान्ताऽ
हृदयांकित कान्ताऽ
अनेकेकान्ताऽ
पराऽ सूत्राधाराऽ
अंबिकाऽऽ विजृंबिकाऽ
शिवहर शंभो
तस्मात् श्रद्धायुक्ता
दत्ता; धिगधित्ता
आरसपान--सावधान, अन्तर्गमन
अन्धःकार पलायन
शुभं भूयात् मङ्गलं भूयात्
पराकुऽ, कूकू, कूहू
प्रफुल्ला सहकारा आम्रा
भ्रमराम्बा--पूर्णा
कुम्भा—आरम्भा
संघाते परिणमिताऽ
विवर्ताभासा
स्वप्नविलासा वासवदत्ता
वासवी ऽ इन्द्रा
स्वस्था ऽ। चित्ता। चित्र केंद्रा
नमो नमो रक्ष मां माता सुप्रीता
मूलाधारा परा
पुष्करिणी–बिम्बा
गर्भिणी विमर्शिनी
उन्नीता पयसोजाता
कंठाभरणा विशुद्धस्मरणा
मध्यमा पंचमा, नेत्रोन्मीलिता
सती, सीमंतिनी
पश्चिमे उदिता, मुदिता

अमृतस्त्रवधारा
वैखरी – धीवरी
निषादिनी – वागुरा, सहिता
पशुपाशहिता विहिता
विषादरहिता, पौंड्रक दुहिता
नाचता नाचता, अटन्ती अरण्ये
विद्यारण्ये गुहाहिता
अमृते पिहिता
विधानवती नवती युवती
लीना––नादाधीना.

## बंध

पुरे झाले काव्य भ्रांतीचे – होऊ दे आगमन संक्रांतीचे
नकोस होऊ भ्रांत
भुकेने होऊन श्रांत
पोळी देईल मकरसंक्रांत !

आज येणार कर्क संक्रांत, गंगा-संग
श्रावणातील सिंहयोगाचा मार्ग
या गुहेला परतीच्या पाउलखुणा वर्ज्य
सिंहाला पाहिलेल्याने तर
केला सिंह स्वाहाकार.

पशूंमध्ये सारा हाहा:कार !
पौरुषाच्या शक्तीचा होईल का कधी अस्त ?
रात्रीचा काळोख पिणार आहे
सांध्यरागाची शिंदी
माथ्यावर पूर्ण नक्षत्र – नि:पक्ष हे क्षेत्र.

खुल्या नाटयगृहात शिरून
बाहेर येण्याचा हक्क––पक्ष्याला आहे ती मस्ती
संभवाला असंभवच स्वस्ती
नीळकंठाने केले प्राशन आकंठ
रजस्तमाचे – अंधतमाचे
दशकंठाला नाही आराम.

संहार हा विश्राम.
जयाचे विजयद्वार – जय विजय साकार
गर्भात आहे सुप्त
दैव–दैवाचा–अवतार
कली कल्कीला गाठ
न सुटणारी गाठ :
हे पाहून सुंदराने – केला कर्तरी योग.
हवा कर्मणी प्रयोग
ज्ञानाला संबंध—अज्ञानच बंध !

## *ओव्हर-दूध*

(उत् सभा)

हंसाच्या निरीक्षणात पुन्हा पाणीच–दूध
ओव्हर–दूध.
इथे साय होते आहे दुधाची; दुधाचे नवनीत
नाइस् क्रीम आइस् क्रीम – म्हणत.
विरजणाने घट्ट होत नाही दूध ?
घुसळण्याने रवीभोवती असंख्य कण – लोण्याचे
घट्ट असे तूप अग्नीत
रोमहर्षित नारदाची शेंडी
वाणीला वीणेला साक्ष – ध्यान अतिगहन
किंचित् भोवती राहिले आहे न मरता कुठे तरी ?
होऊन कलाकृती, सात्विक अभिरुचीचे सौंदर्यसार.

ओहो हो ! गुळाची चामुंडी – ओटी भरून घेईल ?
शिवजटेतील चंद्राचे चांदणे
भरणी-मंडप-जल बिंदु मौक्तिक सिंधु
चिच्चकोरीचा घास.
ऱ्हीम लाज – लाजा होम
धूम धूम – अश्रू – खीर – पायस
"यत्र यत्र धूमः – तत्र तत्र वन्हि:"
कढईत दूध – कठड्यात ज्वाला
क्लीम् क्लेशनाशिनी ! हृदयवासिनी
उघो देवी – आम्ही आलो बंदरात
कर आमचे स्वागत.

शारदेचे हंस आले परत
कमल सरोवराप्रत भृंगयुक्त पक्व फलाप्रत
मंदार – गांधार
दिसायला दिव्य – श्रुतीला आधार.

## हेटर - डॉक्सी

मांड पाट
फ्रूड – ॲडलर – जुंग यांच्या पायावर डोके टेक
तोंडात आलेला खाकरा परत गिळून टाक
पिता – पितामह – प्रपितामह
श्रद्धेवाचून श्राद्ध होईल ते सुभद्र ?
पॉलिटिक्स् आणि मिस्टिक्स् करा मिक्स्
आणि त्याचे होईल सोशल डायनामिक्स्
डायनामाइट्च भिक्षु फिक्स्
श्रेयांसीने दिलेला तो नव्हे इक्षुरस – भो !
पारद – रस, श्रीपाद – रस !
अल्केमिस्ट्री Transforms History
Into mere Geography
Spirit does not matter
Mister ! Silence is better.

शब्दवेध घेऊन दशरथाने श्रावणाची हत्या केली
दशमुखासुराला मारणाऱ्या रामाची प्राप्ती झाली !
वणवण हिंडून वाल्मिकीने रामायणाची रचना केली.
ये सीता या ! रामाची आहे अग्नि-परीक्षा
नवनवीशी दीक्षा.
हृदयाला हृदयच साक्षी
नाही दुसरी Proxy.

## संस्कार तसा आकार

वाल्मीक बेरड, त्याची वारुळ – वस्ती
मी मृगशिरव्याध, गोत्र अगस्ती.
न्यायवैशेषिकाची ब्रह्ममीमांसा
सांख्ययोगाची भाषा.
आनंदघोष – 'बँ' म्हणतात लोक.

अरविन्द नवनीत, भव्य भगवद्‌गीत
'हूज हू' रसरसीत मोती
ते औषध – मोहक
अलिगुंजारवाला पंचाईत का ?
गांजाप्रमत्तांना वाटेल ती देणगी का ?
ये बन्धो – मी, तू एक
हाच शिवसंग, विठ्ठल अभंग
हे महाश्वेते !
'तव रतिरभविष्यत् पुण्डरीके किमस्मिन्'
वैशंपायन पोपट नव्हे – मी कन्नड पिंगळा
कादंबरीला मिळाला
चंद्रापीड. कोठून आली पीडा ?
ये ग पत्रलेखे, ये ग चित्रलेखे
दे कुंचला – आण रंग
दैदीप्यमान अशी सोमचापज्वाला
तू उषा – मी अनिरुद्ध
तुझ्या सौंदर्याला भुलून अंत:पुरात आलो
बाणासुराला दिली लिंगदीक्षा
पुरे झाली ती अंगदीक्षा
'ॐ भवति भिक्षां देहि'
अनुसूये ! अत्रिगोत्र माते
धुत्त म्हणून आला हा दत्त
कोठून कोठे ?
तू रक्षणकर्ता, ती तर विभूती.

गोपीचंदनात मैनावतीची माया
अश्रूंची दाट छाया
मै ना, मै ना, मै नाचुंगी, मीराके प्रभु
कामलतेच्या वेलीवर उमलणारी कळी !
टेकायला आसरा ? मागायला सुलभ ?
द्यायला साध्य ?
निर्मल लिंगाभिषेकजलच तेवढे पवित्र ?
अग्निमध्ये सोम – तेव्हा अग्निस्तोम
गावकऱ्यांचे भाडे भागवून
गावाकडे प्रयाण – सीमेकडे भ्रमण
हा विरक्त श्रवण.
ज्यांचा जसा संस्कार,
त्यांचा तसा आकार
उरलेला सारा विकार.
अर्धे अर्धे नको वाटू –
पूर्णाला भाग जाईल का ?
जागृतीसाठी जागरण
हेच सुनागरिकपण ?
मुद्राच तिरस्कार
संस्कृतीच अधिकार !

## महात्म – वचन

'भक्ती विनयवतीची पुत्री'
अध्यक्षा झाली या अभंग राष्ट्रक्षेत्री.
प्रजाजनांत स्वप्रज्ञा आली ?
स्वाराज्य न चालविता
एकराट् भूमंडलाच्या विश्वसंस्थेमध्ये
निद्रा निश्वासांच्या आश्वासनाला
भीक घालतील का, सांगा मला
विनंतीला मान देणारे – मानाला हपापलेले
आमंत्रित नेते, इतर नेते नि उपनेते सगळे
कुठेतरी घेतात खाना
दिग्देश विचरन्ति
स्थिरतेला हाच पक्वान्नाचा थाट
व्यभिचाऱ्याला विष – काल-कूट !
'you know,' 'I know'—
The world does not know
नो–पेन, नो–गेन, नो–नाटकाची रीत, नो–कषाय.
ना त्रास, ना व्रत – नुसती कबंधच्छाय
हातातोंडाचा खोटा लढा, वायसदाय.
पुरूष नृत्य करताना प्रकृतिमंडलाचे साक्षित्व
उदासीन – सभासद – भास – आभास
आहार – निद्रा – भय – मैथुन
मिथ्याचार
चातुर्य – चारुत्व – चारित्र्य नष्ट करणारा
पंचत्वाचा आचार
येग तारक प्रज्ञा – अभिज्ञा –
पुरे झाली घटोत्कच संज्ञा.

वत्सलाहरण अभिमन्यु नाही करणार ?
हे कृष्णसंधान !
भक्ती विनयवतीची मुलगी
युक्ती अनुसंधान.
गंगा विनयवतीची मुलगी
नव्हे, यमुनेची मुलगी
कोणत्या विनयवतीची मुलगी
काढून मळ होऊन निर्मळ
जगली उपेक्षित जीवन
त्रिलोक सूत्रधारिणी
ही गाय रे गाय !
विषयलंपट वृषभ
फोडतो आहे डरकाळचा.
ब्रह्मचर्याचा खोंड
कुठे असेल रे देवा ?
कुणीतरी, कोठेतरी लोथलीमध्ये !
पुरून ठेवला लगाम — लंगोटा.
हिरोशिमाची विकृत प्रजाच हवी ?
भूकंप — अनुकंप
ये बाबा जगत् झंप

## *कोण कुणाचा सखा, जीवा?*

तू कोण ? मी कोण ? कुणाचा कोण ?
परतले नाहीत गेलेले
आजचे नव्हेत असलेले
मुद्रा मात्र काहीशी स्थिर

अनर्थल्यावाचून नाही अर्थाचा आधार ?
शिव हा गुरु, शव ही संज्ञा
सारे पशू पशुपतीच्या सभोताली
गाडलेला अर्थ खोलून
त्यांना काय प्राप्ती झाली ?
शकल... विकल...

वर्तमानकाळाच्या छातीवर भूतकाळ
मरून न मरण्याची आस
जगून न जिण्याची हौस
पडून राहिला आहे रस्ता
उभा राहिला आहे खांब
डोळेच नाहीत पायाला.

डोळे नुसता आरसा
पुढे हो तू जरासा
मागे चाबूक
इंद्रजालाचे तबक, आकाशभर
'टिंब, टिंब, जगदंब'......हे स्वर
निर्बीज निर्बीज
नुसता केरकचरा
कृमी कीटकांना आसरा

एकमेकांवर
लिंगभंग, अंगसंग
हरहरा, पापदूरा
उत्तमाधम पथांच्या मधेच
दुर्गादेवीची वाट
तिथेच प्रेत उचललेल्या
प्रेताची आहे वाट
मातीत आहे गारवा
इथे आहे सारे भ्रांत
शब्द आहेत नुसते श्रांत.
मन्मथाच्या मंथनात अग्निबिंब
मागची सारी शोककथा
आजची आहे जीवनगाथा
किस्मतीला अकस्मात् मरणाचे मौन
पश्चिमेकडील समुद्रात परतण्याची घाई
पूर्वेकडे बुजबुजाट किड्यांचा होई.
कोठेतरी आग लागली
हे त्याच्या सभोताली
चोहोकडे पिसांच्या राशी
औटघटकेची तर मौज
मुक्ती देते काशी.
ऐकायला मुळी कानच नाहीत
सारा मंत्रवाद्यांचा बाजार
तेथे मंत्रतंत्राचा व्यापार
मधून मधून मोडके तोडके मंत्र
भारतमातेजवळ उत्तरेच नाहीत
प्रश्नांवाचून दुसरे काहीच नाही.
उसाशांच्या ओळीच ओळी
प्रश्नांची नुसती साखळी.

## निर्बुध्द

आम्ही आहोत मात्सर्याचे उपासक
आम्हांला नाही कशाचे सोयरसुतक
मारणे नि मरणे हेच आमचे कार्य
डोईची किंमत विचारतो हा आर्य !
भूमी म्हणजे माती, प्रजासुद्धा माती
मसणवटीची ही नागरिकनीती
शस्त्रास्त्रांची करितात गुप्त तयारी
भासवितात मात्र वेदांताचे कैवारी
तत्त्व चर्चा काय ? तत्त्वाचे गुणगान काय ?
तत्त्वच्युती हेच यांचे जीवितकार्य
गटागटांच्या राजकारणाचा इतिहास
हंपीचे झाले स्मशान – जुना इतिहास.
रामराजाचे मुंडके धुळीत पडले आहे
तो सर्वांच्या थट्टेचा विषय झाला आहे.
'आल्बिदा' आदिलशाहीचे झाले
सारे देव तडीपार गेले.
कबर कबरीला भार,
कवडयांची मात्र गळचाला तात
हे, हे वैभव ! याची किंमत दीडदमडीच्या आत.
राम आला काय नि कृष्ण गेला काय ?
जनसामान्यांच्या तोंडात मातीच नव्हे काय ?
यज्ञ होऊन काय नि होम करून काय ?
कोकराचे 'बँ' म्हणणे कधी चुकले आहे काय ?
आमचा देव मोठा, लहान तुमचा देव
दीपदान देणाराच मारेकऱ्याचा महादेव
बुद्धच असू दे नाहीतर असू दे तो सिद्ध
इतिहासापासून धडा न घेणारा शुद्ध निर्बुद्ध.

## *हा पाडवा*

ज्याला त्याला आपापला मार्ग
तुझा माझा एकच वर्ग – एकच दाई प्रेमार्द्र
युगाचा मध्यबिंदु एक.
हा गुढी पाढवा
हो संवादी, गाढवा !
कशाला रत्यावरील तंटे वाढवा ?
बाबा, आमचा मार्ग साहित्याचा
काय उपयोग झगडण्याचा ?
ना तंटा, ना विसंगती
तुझे काव्य तुझे सांगाती.

कालपरवा जळून भस्म झाला
होळीमध्ये मदन, त्याचा झाला काला.
चैत्रगौरी राहते पेरत
शिवाचे नाव घेत सतत
माधवाच्या रासक्रीडेला
हाच ऋतु चांगला.
वादळी वारा, वळवी पाऊस
उघडेल दार, ताई पाहात बैस.

वसंतातली पाने हिरवी, पिकली, पिवळी
आणि पडतील जमिनीवर गळून सगळी
फळे उधळतात बियांना इतस्तत: बाबारे,
ना आदी ना अंत, मग मधला मार्ग सांग बरे !

प्रीतीचो मदार असतें
युगायुगांच्या विरह-वेदनेत.
माझे श्वास नि तुझे श्वास येतात
एकत्र मैत्रीच्या वातावरणात.

श्रावण महिन्यात श्रवणसुख
माघात पाहण्याचे सुस्नात मुख
आश्विन-रवी व चैत्र-चंद्र हे दोघे
ठाकतात समोरासमोर उभे.

मधु माधव राधा रति
फुलते वैशाखि प्रीति
नैसर्गिक वैसर्गिक
छंदोमय प्रतिकृति
कवि होऊन करित कथन
करि होऊन कर्ण श्रवण
भव भव भवपार खचित
मधु मधु मधु भावोत्थित
सायक हा प्रापंचिक
तंतुवाद्यसह गायक
मायावी पुष्प फळत
राजहंस तैं पोहत
सुखेनेव तडागात.
नको होऊ मार्गस्थ
होईल कोणताही मार्ग पाडवा ?
युगयुगलांच्या विरहात
वसे प्रीतीचा पारवा.
सत्य–सुस्वर–संगम
संगीत हृदयंगम
छांदसिकता मुक्तमार्ग ?
श्रुति–कृति–युति खरा मार्ग.

## *चैतन्याची पूजा*

चालली ही आहे चैतन्याची पूजा
पाहा ताई जरा । अभंगाची मजा ॥

सौजन्य नावाचे पहिले हे फूल
उमलो सकलां सदा सर्वकाळ
सामर्थ्य नावाचे बेलाचे हे पान
अर्पू या शिवाला नको अनमान.

सत्य या नावाचे नित्याचा हा दीप
चोहोकडे जाण त्याचेच हे रूप
प्रीती या नावाचे खास हा नैवेद्य
असे हे सर्वांच्या हृदया संवेद्य

सौंदर्याचे ध्यान होते हृदयात
अस्पर्शाचे तैसे चिन्मयाच्या आत
आनंदगीताचा करा सामवेद
सारेगम स्वर होतो त्याचा नाद

'उद्भव,' 'उद्भव,' हे मंगलमूर्ती
ओहोहो, अहाहा, अमामा, दे स्फूर्ती
आत्मा, परमात्मा आणि अंतरात्मा
अगाध आहे हा तुझा रे महिमा.

*पंचारती*

१

स्वैपाकघरात, बाई, चूल आता पेटव
अन्नदेवाला झटपट नैवेद्य तू दाखव
कसा करतो बाई आवाज तो घुर्‌घुर्
अग्निजिव्हा ज्याची असा शिवशंकर.
सुचवतो हा कसा पाहुण्यांचे आगमन !
कळेना कोण कोण येणार माहेराहून
येईल का रे मामा, आईचा तो भाऊ ?
सांग गिरिजारमणा, शपथ तुझी घेऊ ?

२

येऊ द्या मिळून चौघाही पाहुण्यांना
करू द्या स्वीकार नैवेद्याचा त्यांना
मित्र, वरुण, सोम सारे देव जमले
भगभग म्हणजे सौभाग्य आणू म्हणतात भले
येरे बाबा सोमा, होऊ दे ते सामगान
बसून त्यांच्या जवळ कर अन्नग्रहण.

३

केला पाहिजे मोठा देवापुढचा दिवा
समईत तेल घालून वात पुढे ओढा
खाली वाकून तुम्ही दोन्ही हात जोडा
दाखवून तुम्ही नैवेद्य देवापुढे मागा

४

अन्नाच्या भांड्यात नि चुलीच्या खाली
पाहू दे चूलदेवी भक्ती युक्ती वेळोवेळी
करशील का मदत बल्लवाचार्याला ?
पाकसिद्धीत निष्णात आहे तो भला
कारण, मला ठाऊक सारे तो जाणतो
आमचे शब्द नि रूप यांच्यात विलीन होतो.

५

जळो राजकृपा आणि त्यावर जगणे
बरी ती गरीबी सुखाने ते राहणे
होऊ देत तुझे स्तन अमृताचे गे कुंभ

॥ ॐ तत् सत् गुरुभ्यो नमः ॥

## हृदय शेतकऱ्याचे गाणे

तत् नावाच्या तत्त्वाचे बीजारोपण
सत् नावाच्या सत्त्वाचे आरोहण
चमकणाऱ्या चित्रासाठी,
                नि अधरस्वाति—मौक्तिकासाठी
सूर्यदेव आला पाहा, वर, डोक्यावर
खोंडाला ने पाण्याला, कुठेतरी वर

हृदयाच्या टांकसाळीत प्रीतीचा भाता
ऐरणीवर ठेवला आहे  हातोडा तो आता
अग्नीचे स्फुल्लिग ढणढण दिवा—घंटा
कर्तव्याला आहे प्रीतीचे ते बळ
ये दादा, ये भाऊ, या सारे जवळ.

दगड झालेले देव, माती झालेले देव
रक्षा झालेले देव जातील
रंग झालेले देव, चुना झालेले देव
डोळे झालेले देव येतील
वर माग, वर माग, म्हणतील.

"रविचंद्र घरचे दीप। भूमीला पाणी समीप
मानव-कुल सारे होऊ दे एक
होऊ दे त्यांना सच्छील नित्यनूतन
जगू दे त्यांना भले होऊन;
                देवाघरचा प्रकाश होऊन
जाऊ दे त्यांना पुढे—पुढे—पुढे."

## *अहंकारविमुक्तार्थाय*

दास पुरंदर विठ्ठल – देवा
अहंकार मम आता जावा ॥ धृ ॥

वामनमूर्ती स्थूलकाय ती
वसे कधीची हृन्मंदिरि ती
जेव्हा जेव्हा रविकिरणोदय
तुषार उडती वाटे विस्मय

चित्रविचित्रच पांडुरंग तो
सूत्रधारस्मृति आम्हां देतो
नरनारीगण नाटचनर्तनी
विणुनि ठेविती हृदय-बंधनी

विश्व प्रवेशुन ईश्वरस्मृतिसुम
चरण विटेवर त्याचा संभ्रम
विठ्ठल, विठ्ठल नामस्वरूपी
पुंडरिका भेटे बहुरूपी.

## *संभू – शंभू*

आमचा देश भूप्रदेश
सार्वभौम भला
हाच जीव, तोच आत्मा
विसरला तो मेला.

जागृतीला दृष्टी आड
पहिल्या स्वप्नाचे स्मरण
निद्रिस्त असता बुद्धी
जाणिवेला येते मरण

स्मरणाचे कणकण, रण
स्मृतीला आधार विस्मृती
अनंगाला मरण नसेल का ?
बीज बीज शिवस्मृती.

शिवपार्वतीचे होऊ दे नर्तन
भूतमात्रांच्या प्रांगणात
हे अभूत ! हे अपूर्व
गायन होऊ दे मौनात.

बुभु:कार संजीवन संभू ऽ
शंभू ऽ
ॐ भू ऽ

## दृष्टि - विकास

चुनखडी फुलून घर स्वच्छ करते
आम्हां तुम्हां सर्वांचे स्वागत करते
मनामनाला खुलविते, चुनखडी फुलून.

माती फुलून सुती कपडा तयार करते
शरीराशरीराला धाग्याचा आधार होते
देवळादेवळात वात प्रज्वलित करते, माती फुलून.

पाणी फुलून फूल उमलते, प्रकाशावर –
चमचमणाऱ्या माशांना जगा म्हणते
रात्रंदिवस प्रकाश देते, पाणी फुलून.

दिशा उजळून पहाट होते, छाया उजळून सांज होते
निद्रा जागेपणाचे सर्वस्व होते
श्रीशैल तिरुमलेला दिवटी होते, आकाश उजळून.

वाऱ्यावाऱ्याचे मंथन, ते गान ही तान
मन फुलून धुंद होते, तद्ध्यान
सद्ध्यान, मुक्ती, मन फुलून.

जीवन विकसून जिव्हाळा, आम्ही विकसून बाळमळा
लज्जा विकसून हसते, पाळण्याशी –
हस्तांदोलन करते, जीवन विकसून.

दळण्याने दाणे फुलतात, चुलीवर अन्न फुलते
चर्वणाने विडा रंगतो, हृदय फुलून
दूध ओसंडू लागते, बाळ विकसते.

गाभाऱ्यातील देव, दिव्याला दृष्टी येऊन
वळून बघतो अंतर्यामी फुलून, काळोखाला –
होय ना, पत्थरालाही डोळे असतात.

शुद्ध ब्रह्म फुलून शबल ब्रह्म तयार होते
सरगम गीत गाते, कंठ फुटून
अंतरंगच फुलते, ज्ञान होऊन.

(सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म)

## देवत्वाची मिरवणूक

जेव्हा तुझ्या नौबती जातात झडून
तेव्हा जातो जत्रेचा गोंधळ विरून
हे माते, सूर्य असता माथ्यावरी
निघते तुझी मिरवणूक भारी.

तुला म्हणू का मी "माता, माता"
माते, तुझी वाढती कीर्ती आता
सीमा ओलांडते, जीवांना भारते
जसजसे तुझे नाव दिगंत होते.

तुझ्या डाळिंबी – कुसुंबी साडीच्या आरशात
आमचे प्रतिबिंब, आनंद मावेना गगनात
घामेजलेल्या देहाचा दरवळणारा गंध
लोटला जत्रेला सारा गाव अनिर्बंध.

कोणत्या मुशीत बनविलेस मला ?
कारण औषध नाही मुळी भक्तीला
तुझ्या श्वासागणिक असते माया ओसंडत
तिची चोरी करता येईल कोणादेखत ?

ऐकणारे कान आहेत विहिरीसारखे खोल
प्रीती आणि भक्तीचा जिव्हाळा अनमोल
तुझ्या हृत्प्रीतीचे दुग्ध-बिंदू अनेक
तुला शोभून दिसतात जणु हार कित्येक.

प्रेमाश्रुपूरित तुझे नेत्र अति विशाल
मानस-तडागात भक्ति-हंसाची वाटचाल
आलय स्थल व्यापते का स्थल आलयाला?
अगाध ते, उथळ म्हणता येईल का त्याला?

अफाट पसरत्या निळ्या नभाचा आकार
नक्षिदार काळी रेशमी लुंगी जणु साकार
स्त्री आणि पुरुष यांच्यामधले द्वैत
भक्तीच्या सामान्य अशा शैलीत होते प्रतीत.

सावली न देणारी उन्हाची छत्री तुझ्या हातात
खाली पावलांच्या खुणाही नाही दिसत
ओह ! देवी विश्वंभरी, आहे ! दिगंबरी
जनमानस तुझे वस्त्रालंकार भारी.

विविध जाति-समूहांची वाद्ये पारंपारिक
नगारे, सनया, बासरी, झांजा आणिक
प्रत्येक वाद्याचा सूर निराळा
तरीही भक्तीने आपला सूर टिकवितात आगळा.

सर्वांच्या पुढे महमदीय, मागे पुढे मेंढरे
कुकू असा आरवणारा कोंबडा
बोलक्या तोंडाची बोडकी, रती झालेली रंडकी
दुःखाग्नीत साऱ्यांचा झाला आहे बोंडा.

थोरली बहीण दुर्गव्वा व धाकटी देमव्वा
यांनी बनविली राउळे पाहा भक्त-देहांची
पवित्र माळा लोंबतात, छाती होते फुगीर
जेव्हा त्या गातात गाणी सांप्रदायिक तुमची.

शक्ती द्या आम्हांला तुमची गाणी गाण्याला
उबू दे अंड्याला भर दुपारच्या वेळी
तिळा एवढ्या तेलाने लावल्या हजार वाती
उजळतात साऱ्या तुमच्या पूजेच्या वेळी.

तीट, गंध, भस्म तसेच कुंकुम,
काजळ, हळद विलेपून उदंड
ओल्या कपाळावरील ध्वज आणि भुवयांमधील तेज
करतील डोको तप्त नि थंड

लाज नखरा कशाला ? कंप नि भय कशाला ?
प्रलयच मार्ग सृष्टीचा
खुळचा बाळंभटाची डरांवाला साथ
वाचून वेद आजचा.

नंदीचे शेपूट धरून मारुती नाचेल
साळकाया माळकायांनो, या तुम्ही सारे
मत्त हत्तीच्या सोंडेला घातली आहे फुलांची माळ
तलवार उपसून रहा ठिकठिकाणी बरे.

पुरे करा आता जारणमारण तंत्र
रंगवल्ली तोरण जपा हाच मंत्र
रणातही खणखणणारी रणभेरी आणिक
टिपरी यांत असू दे ताल नि तंत्र.

सूर्याची चूल पेटून घरोघरी स्वैपाक
ॐकार कृतीची गिरणी
मंदाकिनी अवतरून भागीरथी उजळून
भेटली तिला नरक—वैतरणी.

कृषिक-चोरांवर देवडीवाला मोर
खुल्या नाटचगृहात रानडुकरांचे संगीत
तोंडातल्या तोंडात गाणे गुणगुणत
हातच्या काकणाला आरशा कशाला !

भोळचा शंकराला धत्तुरा देतील
रत्तलभर धूप जाळून
कामक्रोधादि षड्रिपूनांही जाळतील
मन वाऱ्यावर उधळून

सिद्धलोकाचा अर्हन्त बसल्या ठिकाणी हनुनन्त
पडल्या ठिकाणी ऐकतो बुद्ध
शांततेसाठी युद्ध, शांततेसाठीच युद्ध
क्रांती का भ्रांती शुद्ध.

मुखस्तंभ अशा तुला हात न लावणारे आहेत कोण ?
तुझी टवाळी न करणारे ? तू भोळा महादेव !
हातपाय न हालवणारे आहेत कोण ?
म्हणतात ना गुप्त भक्तीचे सप्त भाव.

त्या प्रहरी या प्रहरी तीन प्रहरी आता इतक्यात
शून्यातच पूजा दिव्य
डेमॉक्रसीच्या सिंहाने आसनस्थ होताक्षणीच
झाले देमव्वाचे आगमन नव्य.

गायलेला सारा छंद, केलेला तो प्रबंध
जमलेली ती सभा, अट्टाहास
बुद्ध कल्की येऊन कृतार्थ ते झाले
कृतयुगाला लाभला संन्यास.

चोर जगतील आणि सात्र मरतील
ना गुपित, ना रहस्य, बडव
धिक् तिट् दिम् दिम् भूतनृत्याची सीमा
अभंग, पोकळ एकोभाव.

तंत्राप्रमाणे मंत्रही आपुले सांगाती
सारा चोरांचा बाजार !
फुलाबरोबर दोरा ? कोणाबरोबर कोणीतरी ?
गंगेला मिळाले अखेर.

अल्याड पल्याड पूल, आत्मा शब्दाला भाळून
चर्मानुरक्त सगंध
विळाभोपळा, माते, तुझ्या हाती देऊन
मर्मच ऋणानुबंध.

नगारे, नौबती, वसुधाच संपत्
उघड झाले आता जाति – गुपित
चरमूर्ति स्थिरमूर्ति दायाद न होता
साकार होऊ दे जगत्

## 'ऐकून बोल,' 'वचन ऐक'

अ आ, इ ई, उ ऊ या स्वर जातीच्या सांगाती
घ्राणमान ज्ञानतान स्वात्म्याची कृतमती
मौन गभीर मंदेहांचा संदेहच ती श्रुती
वचन ऐक.

ऊठ गीते, वेळ झाली मेळाव्यात शिरण्याची
ऊठ, उचल, स्वार हो वेळ नव्हे बसण्याची
पूर्व दिशा झाली निळी, लाल, जांभळया रंगाची
वचन ऐक.

वेलदोडयाच्या मुखवासाच्या सुखवासाचे कंपन
शुक्ति-बिंदु-मौक्तिक-खनि मधु बिंदू घनघन
करील कोणती सिफनी मौक्तिक-जल सुस्वन ?
वचन ऐक.

नाम कामधेनु अता साम-सोम-मूर्तता
नेमिचक्र सदावक्र हृदयाशा-पूर्तता
त्वरित तूर्त, तूर्य-ध्वनि भावभाव-आर्तता
वचन ऐक.

या सूर्याने या निसर्गाने यज्ञ-वेदी उभारून
तत् ब्रह्याचे ॐ विसर्ग सर्ग स्वर्ग निर्मून
सौंदर्यसार खरा आधार उभे नेम धरून
वचन ऐक.

अश्विनि तुळ श्रावण मूल्य तोळाभर गुंजा
पिंजल्यागत वाढत राहतो कापूसवात-पंजा
मौंजिबद्ध ब्रह्मचारी तेजाचा पुंजा
वचन ऐक.

शंभु शंभु ॐ स्वयंभु भव भव भवमुक्त कर
ऋत सत्याचे ते महत्व कर श्रद्धेत रूपांतर
असंख्य मायाकूटातून सुखरूप मजला पार कर
वचन ऐक.

कंठनादाचा आकार हार करून उभा कर
अनुस्वार वर चढवून नश्वर कर ईश्वर
श्रीरंगाच्या रिंकारवाला भेटू दे तो ॐकार
वचन ऐक.

स्वस्ति मङ्गलं भवतु सौरभाग्य ते मिळो
सौम्य सोम प्रतिमासी वाढत तो उजळो
वाद्यवृंदसहित दिव्य गान ते खळालो
वचन ऐक.

नृत्य तेच वर्तन जणु नटन करित जावो
प्रेक्षकात साक्षिकता सप्तपिंड होवो
निर्विघ्नं – चांगु – भला हेरम्ब तुष्ट होवो
वचन ऐक.

मोद की प्रमोद की बृहद्विभूति येऊ दे
विपत्काल गेला, सुर-गान रम्य होऊ दे
मानवतेचे सार्वभौमत्व सूर्यचंद्रांना पाहू दे
वचन ऐक.

प्रतिभेची ती उंची नवनूतन त्या तिकडे
अनादियोग सांख्ययोग अनन्त तेच हे इकडे
मागे पुढे वर खाली आत बाहेर चोहोकडे
वचन ऐक.

अस्थि अस्थि नाद नाद कुठली संवित्ति ती
मातेसम तेल लोणि खाते टाळूच ती
निर्लिप्तच रसलहरी आदित्या ती भित्ती
वचन ऐक.

मेरुदंड तो उदंड ! त्यागी होऊन विचारतो
वर्ण वर्ण ते सुवर्ण प्रकाशात भ्रम होतो
उठव मला आलिंगुन, उठणारच मी म्हणतो
वचन ऐक.

१

जो जो रे बाळा !
जो जो वेल्हाळा
अश्वा – सायुज्या
ज्यावेधा – वेदा.
प्रळयसागरात होते गोंडारण्य
मेंदीसारखे
ध्यान करतो दाल्भ्या बकासारखे
हरिमत्स्याचा बाजार.
चार, आठ, सोळा, बत्तीसही
बहुमुखी ब्रह्म कृष्णार्पण झालेत
जडधीच्या लाटांत
आवर्त पुनरावर्त
वडवानल आपोनारायणात
हरिहरांना ओवाळ
आरती ओवाळ

२

लक्ष्मी, पार्वती, सरस्वती यांच्यात
माहेश्वरीच्या मुखकमलात
ॐ तत् सत् आहे इतिमध्ये
गतीमध्ये, स्थितीमध्ये, रसरतीमध्ये
चत्वारि – चारु – चरित्रा
पवित्रा – सोमानना येग सावित्री.
सत्य – सावित्रीचा कंद, गोविंद,
वेगाने सहस्त्र बाजूंनी
दळदळ एक होऊन
साकारले अरविंद
आरती ओवाळ.

३

अग्नि – सोमालिंगनात
चातुर्याचा बंध
प्रपंच सौगंध
षण्मुख मरंद
सप्तासप्ती सघन घनमेघ
धर्मबोध
मनाकडून सुप्रमनाकडे
उन्मनी सोपान
वर खाली येऊन
मुलांना आशिर्वाद देऊन
जवळ बोलावून
कृपाळु होऊन
ध्यानलीन मीरा,
आरती ओवाळ.

४

जो जो म्हणारे बाळगोपाळांनो
रासक्रीडा करणाऱ्या गोपींनो
गोवर्धनधारी आला
वृंदावनाहून जालंधर आला
मुक्ती-भक्ती एक होवो
नवो नवो नवो
मीरा सुमेरू गंभीरा
इला वृता । विठ्ठलामुळे
इकडे काम तिकडे हयग्रीवधाम
मत्स्य कूर्म वराह उत्तरोत्तरी
देवतात्म्याच्या हृदयांतरी
मधु – उदय.
आरती ओवाळ.

५

'इमानि हिमानि' लय, मलय
चंदनगंध देवद्वार
नृसिंह – राम – परशुराम
जितकाम राम बलराम
देवकीचा कृष्ण
वसुदेवाचा कंद
बुद्ध, महावीर आला
हृद्‌बंध.
नर – नारायण – कीर्ती
भगवद्‌गीता मूर्ती
ओवाळा आरती !

६

यतिवर्यांचे आचार्यांचे सामगान
सर्वलोकैक ध्यान
विश्वेदेवतांच्या सभेत मंत्रपुष्प,
'राजाधिराजाय राधाकृष्णाय
मधुमाधवाय
श्रवणामघाय'
मंगलमूर्ती
विघ्नो विशेषो भवतु
ईश्वर विशेष
अशेष – मणिभूष
पुरुषोत्तम अवतार.
ओवाळ आरती.

७

मीराऽ मीराऽ मीराऽ
हे कोणते ग्राम ?
रामऽ रामऽ
हयग्रीव, हयारूढ
हरिहरि हयमत्स्य
हरहर नरहरी आला
प्रल्हादाचा प्रभु !
शरभ – गंड – भेरुंड
एकैक हृदय
होऊ दे उदय.
ॐ स्वस्ति ! स्वस्ति, स्वस्ति
भूमंडलाचे स्वास्थ्य
लक्ष कार्तिक होऊन
कोटि कोटि अब्ज
आत्मिक तेज, ऋतुबीज
कृतकृत्यतेचे ओज
झाऽ, झाऽ, दधिक्राऽ
दध्यंकाचे सत्त्व, स्वस्ति
ओवाळ आरती.

ॐ शांति: शांति: शांति:

## कवि - परिचय

डॉ. दत्तात्रेय रामचद्र बेन्द्रे
तथा अंबिकातनयदत्त.

जन्म: एकतीस जानेवारी अठराशे शहाण्णव.
जन्मस्थळ: धारवाड.
एकोणीसशे अठरा ते छप्पन्न शिक्षकी
व प्राध्यापकी पेशा; पण राष्ट्रीय-
वृत्तीमुळे बत्तीस ते चव्वेचाळीस
या कालात तुरुंगवास व अज्ञातवास.

एकोणीसशे छप्पन्नपासून पुढे काही काळ
आकाशवाणी साहित्य सल्लागार.

साहित्याच्या साऱ्या दालनांत मुक्त संचार;
पण कवी ह्मणून विशेषत:
कन्नड 'जानपद' कविचक्रवर्ती ह्मणून प्रसिद्ध

कन्नड व मराठी या दोन्ही भाषांवर
असाधारण प्रभुत्व

एकोणीसशे त्रेचाळीस शिवमोग्गा येथे
कन्नड साहित्य संम्मेलनाचे अध्यक्ष.

एकोणीसशे एकोणसाठ 'अरळु मरळु' (साठीबुद्धी)
या काव्यसंग्रहास केंद्र साहित्य ॲकॅडमी पारितोषिक

एकोणीसशे पासष्ट 'सवाद' या मराठी पुस्तकास
केळकर पारितोषिक.

एकोणीसशे चौऱ्याहत्तर 'नाकु तंती' (चार तंतू)
या काव्यसग्रहास ज्ञानपीठ पारितोषिक.

कविवर्यांची आत्मप्रेरणा अध्यात्माची.
सध्या संख्याशास्त्र-संशोधनात निमग्न.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
2898
ग्रं. क्र. 22249
काव्य
ग्रंथसंग्रहालय (स्थापना ...)

REFBK-0022851
REFBK-0022851

## अनुवादक-परिचय

श्री. व्यंकटेश लक्ष्मण जोशी
जन्म: एकोणीसशे सोळा.
निवृत्त प्राध्यापक, गव्हर्मेंट कॉलेज
ऑफ़ एज्युकेशन, बेळगाव.

मराठी पाठ्यपुस्तक रचना-समितीचे
माजी अध्यक्ष.

द्विभाषा -(कन्नड व मराठी)- विशारद.
पेशा शिक्षकाचा.
छंद: काव्य, नाट्य साहित्य वाचनाचा.
फावल्या वेळात लेखन.

आतापर्यंत विविध नियतकालिकांतून
आणि क्रमिक पुस्तकांतून
ललित नि समिक्षात्मक लेख प्रसिध्द.

आमचे प्रकाशित काव्यसंग्रह

**अभ्र**

कृ. ब. निकुम्ब

(महाराष्ट्र राज्य पारितोषिक)

**श्रेयसी**

डॉ. पंडित आवळीकर



साहित्य-समीक्षकांत बरेच हेवेदावे आहेत. राजदरबारी मान्यता मिळविलेला काव्यग्रंथ सर्वमान्य झालाच असतो असे नाही. विचारकांत सहमत होऊ शकत नाही. मंथनात नवनीतही येईल, ज्वालाही पेटेल. हे कुरुक्षेत्र चुकविता येणार नाही.

सहृदयता आणि विवेक यांची जोड झाल्याशिवाय सफलता आणि विफलता याचा तरी अर्थ काय? संवाद (कृष्णार्जुन) कुरुक्षेत्रावरही निष्फळ झाला नाही. 'चारसंतु'चे वाचन रसिकांना उद्दीपक होवो.